
हीरकमहोत्सवी कोल्हापूर चित्पावन
संघाचे मुखपत्र

स्थापना : १९६४

६०



ब्रह्मतेजो बलंबलम्

# मासिक नवस्नेह

वर्ष १० वे : अंक ३
जून २०२४

स्वागतमूल्य
₹. 30/-



प्रेषक
**कोल्हापूर चित्पावन संघ (रजि.)**
४२८, बी वॉर्ड, तुळजाभवानी संकुल, गुरुमहाराज वाड्याजवळ, मंगळवार पेठ,
कोल्हापूर ४१६ ०१२. फोन : ०२३१-२५४६२२५, मोबा. ७६२०५४६२२५
Visit us on www.kolhapurchitpavan.com
ईमेल : kolhapurchitpavan@gmail.com
https: //www.facebook.com/kolhapurchitpavan

# चित्पावन संघाचा ६० वा वर्धापन दिन उत्साहात संपन्न

## विविध उपक्रमांचे यशस्वी आयोजन





हीरक महोत्सवी कोल्हापूर चित्पावन संघाचा ६० वा वर्धापन दिन दि.४ जून रोजी मोठ्या उत्साहात आणि विविध उपक्रमांनी साजरा करण्यातआला.

वर्धापन दिनानिमीत्त संघाच्या गुरू महाराज वाडा येथील कार्यालयात श्री केदार जोशी यांनी श्री सत्यनारायण पूजा केली. श्री. अमोघ भागवत यांनी पौरौहित्य केले. संघाचे सभासद व हितचिंतकांनी दुपारी ४ ते सायंकाळी ७ या वेळेत संघ कार्यालयात येऊन तीर्थप्रसादाचा लाभ घेतला.संघाला शुभेच्छा देण्यासाठी तब्बल २०० पेक्षा जास्त लोक उपस्थित होते. सर्वांचे स्वागत अध्यक्ष मकरंद करंदीकर व उपाध्यक्ष प्रसाद भिडे यांनी केले. यावेळी संचालक नंदकुमार मराठे, किरण जोशी, श्रीकांत लिमये, संतोष साने, सौ सीमा गोखले, सौ. संगीता आपटे, प्रसाद खाडिलकर, महेश खाडिलकर, परशुराम पतसंस्थेचे अध्यक्ष मुकुंद गोरे, माधव करंदीकर, ॲड. जोशी, सौ. पेंडसे ब्राह्मण सभा करवीर मंगलधामचे अध्यक्ष संतोष कोडोलीकर आणि वुई फॉर अर्वस गृपचे सदस्य उपस्थित होते.

# चित्पावन संघाच्या वर्धापन दिनानिमित्त रक्तदान शिबिराचे आयोजन






चित्पावन संघाच्या वर्धापन दिनाचे औचित्य साधून विविध सामाजिक उपक्रमही राबवण्यात येत आहेत. याचाच एक भाग म्हणून चित्पावन संघ,श्री परशुराम चषक क्रिकेट स्पर्धा कमिटी यांच्या सयुक्त विद्यमाने संघ कार्यालयात रविवारी (दि.९) रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यालाही मोठा प्रतिसाद लाभला.

संघाचे हीरकमहोत्सवी वर्ष आणि छत्रपती शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक दिन सोहळा या निमित्त घेण्यात आलेल्या या रक्तदान शिबिराचे उद्घाटन सारस्वत बोर्डिंगचे उपाध्यक्ष सिद्धार्थ लाटकर यांच्या हस्ते करण्यात आले. शिबिराला प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. अभिजित गणपुले आणि गौतमी  गणपुले उपस्थित होते. स्वागत कार्यवाह केदार जोशी यांनी केले. उपाध्यक्ष प्रसाद भिडे यांनी पाहुण्यांचा परिचय करुन दिला.

डॉ. गणपुले यांनी रक्तदान का करावे, त्याचे महत्व उपस्थितांसमोर मांडले. तर गौतमी गणपुले यांनी स्त्रियांनी सुद्धा रक्तदान करावे असे मनोगत व्यक्त केले. सर्व मान्यवरांचा सत्कार डॉ. नंदकुमार जोशी व राधिका नंदकुमार जोशी यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी ११० वेळा रक्तदान करणयाचा विक्रम केलेल्या राहुल गोखले व संजीवन ब्लड बँकेचे संचालक अतुल नरके यांचा सत्कार करण्यात आला. शिबिरामध्ये तब्बल ४५ जणांनी रक्तदान केले. यामध्ये ज्येष्ठ रक्तदाते माधव करंदीकर यांचाही सहभाग होता. सर्वांचे आभार परशुराम क्रिकेट समितीचे अध्यक्ष केदार वाघापुरकर यांनी मानले.

शिबिराला शुभेच्छा देण्यासाठी ब्राह्मण सभा करवीरचे अध्यक्ष संतोष कोडोलीकर, श्रीकांत लिमये, चित्पावन संघाचे संचालक–सभासद, वुई फॉर अर्वस गृपचे सदस्य, परशुराम चषक क्रिकेट समितीचे सदस्य उपस्थीत होते.

– निखील गोखले

## कोल्हापूर चित्पावन संघाचे मुखपत्र

# नवस्नेह

**वर्ष १० वे : अंक ४ : जुलै २०२४**

- **संपादक** श्री. सदानंद दिनकर मराठे
- **कार्यकारी संपादिका** प्रा.सौ. मंजुश्री गोखले 8805355200
- **सल्लागार** सौ. पल्लवी देशमुख 9420455984


**अनुक्रम**


१) **संपादकीय** /४

२) **भ्रमनिरास** /५ - सौ. कमल हर्डीकर

३) **माझी बँकेतील मुशाफिरी** /९
- शब्दांकन : श्रीकांत शिंत्रे, सौ. ज्योत्स्ना शिंत्रे

४) **मुलांचे पान** /१२

५) **ज्ञानसूर्याची सावली** /१४ - सौ. मंजुश्री गोखले

६) **सोपानदेवांची 'अलौकिक सोपानदेवी'** /१६
- सौ. मंजुश्री गोखले

७) **सप्त चिरंजीव** /१७ - सौ. ज्योत्स्ना शिंत्रे

८) **सार्वजनिक काका - वासुदेव गणेश जोशी**/१९
प्रकाश देशपांडे

९) **मुस्लिम स्त्री कलाकार** /२१
- प्रकाश गानू

१०) **पैसा झाला मोठा, नाही आनंदाला तोटा !** /२३

११) **शैक्षणिक पारितोषिक योजना** /२४

१२) **वधूवर माहिती यादी** /२५



- **मुद्रण स्थळ** मुद्रिका कमर्शियल प्रिंटर्स,
१३०५, ए, शिवाजी पेठ, कोल्हापूर.
मोबा. ९९२१६६९६६६

- **अक्षरजुळणी** ज्योती अरुण काटवे
विराज कॉम्प्युटर सर्व्हिसेस,
कोल्हापूर. मोबा. ९०२१२३४८९०





हीरकमहोत्सवी

## कोल्हापूर चित्पावन संघ

मंगळवार पेठ, फोन : ०२३१-२५४६२२५
०२३१-२९९१६७३, मोबा. ७६२०५४६२२५

- **संचालक मंडळ**

**श्री. मकरंद विष्णू करंदीकर** (अध्यक्ष)
9421113005
**श्री. प्रसाद प्रभाकर भिडे** (उपाध्यक्ष)
9822248500
**श्री. केदार वसंत जोशी** (कार्यवाह)
7588839527
**श्री. संतोष वसंतराव साने** (सहकार्यवाह)
8459019091
**सौ. संगिता संजय आपटे** (खजिनदार)
8149480034

- **संचालक**

श्री. सदानंद दिनकर मराठे 0231-2541823
सौ. सीमा सुरेश गोखले 9420455159
श्री. हृषिकेश भालचंद्र लिमये 9404260470
श्री. किरण विनायक जोशी 9890003810
श्री. श्रीकांत अनंत लिमये 9423980380
श्री. दत्तात्रय वामन आपटे 9422043366

- **तज्ञ सल्लागार**

श्री. प्रसाद खाडिलकर 9822084305

- **सल्लागार**


श्री. विष्णू दिनकर वझे 9637255984
श्री. मोहन मधुकर दातार 9881874701
श्री. शिरीष श. ताम्हनकर 9422590025
श्री. निनाद खरे 7057151549
श्री. महेश खाडिलकर 9422046611


**कामकाजाची वेळ**
**सकाळी १० ते सायंकाळी ६ (साप्ताहिक सुट्टी नाही)**


या अंकातील लेखातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही.


**'नवस्नेह' मासिकाची ठेव, वर्गणी अगर इतर कोणत्याही पेमेंटसाठी**
**'कोल्हापूर चित्पावन संघाचे' खात्यांची माहिती पान क्र. १६ वर दिली आहे.**

# संपादकीय...



नमस्कार मंडळी !

कसे आहात? उन्हाची तलखी गेली म्हणून सुखावलेले की पावसाची रिपरिप वाढली म्हणून कंटाळलेले? अर्थात यातलं काहीही असलं, तरी आपल्याला ते स्वीकारायला हवं होतं म्हणा. कारण 'त्याच्या'पुढे कोणाचं काय चालणार? पण ठिक आहे. अजूनही 'तो' आपल्याला सांभाळतोय. आपणही 'त्याला' सांभाळले पाहिजे.

मित्रांनो, हे संपादकीय लिहीत असताना अर्धा जून संपत आलाय. पण कोल्हापूर जिल्ह्याला म्हणावा तसा पाऊस अजूनही पडलेला नाही, की पावसालाही राग आलाय? असो. पडेल अशी आशा करूया.

आता आषाढ आहे. चातुर्मास सुरू होईल. चातुर्मासासोबत व्रतवैकल्ये, उपासतापास, पूजा अनुष्ठानं यांची रेलचेल असेल. हिंदू धर्माच्या अनेक प्रथा-परंपरा, प्रतिकं जोपासण्याचा हा काळ. यातच आषाढी एकादशी ! म्हणजे वारकऱ्यांची पर्वणी ! आणि वारी ही या भक्तीची बाजारपेठ ! कसल्याही आमंत्रणाशिवाय, कुणीही न बोलावता, कसलंही, कुठलंही प्रलोभन न दाखवता लाखोंच्या संख्येनं विठ्ठलभक्त पंढरपूरला जमतात. हे आमच्या भक्ती संप्रदायाचं एक गोमटं आणि सुंदर रूप आहे. अगदी विठ्ठलाच्या सुंदर रूपासारखं ! आपण या दोन्ही रूपांपुढं नतमस्तक होऊया !

मित्रांनो, आपलं सप्त चिरंजीव हे सदर या अंकापासून खऱ्या अर्थानं सुरू होतय. या सदराचं वेगळेपण आता या अंकापासून वाचायला मिळेल. मित्रांनो, आपल्या नवस्नेहच्या दिवाळी अंकाची तयारीही सुरू झाली आहे बरं का ! तुम्ही तुमचं साहित्य पाठवताय ना? लवकर पाठवा हं ! गेल्या वर्षी काहींनी साहित्य उशिरा पाठवलं आणि वेळेअभावी आम्हाला ते अंकात छापता आलं नाही. तेव्हा उचला पेन आणि लिहायला सुरुवात करा बरं !

मागच्या महिन्यातले आपले सगळे कार्यक्रम मात्र दमदार झाले हं ! त्यांची एकेक झलक मासिकात दिली आहेच. आपली यंग जनरेशनही पुढं येते आहे ही प्रचंड सुखावणारी गोष्ट आहे. त्यांचे अभिनंदन !

पावसानं सुरुवात तर दमदार केली आहे पण शेवटपर्यंत जातोय की नाही पहावं लागेल. नाहीतर सेंचुरी मारण्याच्या इराद्यानं आलेला ओपनींग बॅटस्मन पाचव्या ओव्हरला आऊट व्हायचा, नको रे बाबा, असं काही करूस ! या निवडणुकीनं बुद्धीचं पाणी पळवलंय, तू तोंडचं पाणी पळवू नको ! अगदी भरपूर, मनसोक्त कोसळ. तुझं स्वागतच असेल. तू येशील रे ढोल-ताशे बडवत ! पण आम्ही तुझं स्वागत शांततेनं, पण आनंदानं करू !

**शोर करते रहो तुम सुर्खियों में आने का**
**हमारी तो खामोशियां भी एक अखबार है ।**

तेव्हा मित्रांनो, पावसाचे तर स्वागत आहेच, पण तुमच्या सूचनांचे, अभिप्रायांचे, दिवाळी अंकासाठीच्या साहित्याचेही स्वागत आहे ! धन्यवाद !

आपली स्नेहांकिता,
**सौ. मंजुश्री गोखले,** मो. ८८०५३५५२००

**नवीन तहहयात सभासद होण्याची संधी**

**संघाची सभासद वृद्धी योजना सुरू झाली असून या योजनेत रु. २६०/- मध्ये तहहयात सभासद होण्याची संधी मिळणार आहे. तरी ज्ञाती बांधवांनी या सुवर्णसंधीचा फायदा घ्यावा.**

# भ्रमनिरास

## (लेखांक ६)

बापूंचा परिवार म्हणजे जणू मूर्तिमंत गोकुळ असं सारेजण म्हणत असत. बापूंच्या पत्नी ताई, त्यांची एक अविवाहित मुलगी, जी चांगल्यापैकी कमावणारी होती. मोठा मुलगा सुरेश, त्याची पत्नी रेखा, दोघांनाही नोंद घेण्याइतपत पगार. त्यांची दोन मुले. धाकटा मुलगा सुयश, सुयशचा छोटासा व्यवसाय. त्याची पत्नी सुजाता, केवळ गृहिणी. सुयशच्या दोन मुली. असा अकरा जणांचा परिवार एका छताखाली रहात होता. बापू आणि ताई दोघांनाही निवृत्ती वेतन मिळत होतं. बऱ्यापैकी पैसा गाठीशी होता आणि कुणासाठी शिल्लक टाकायची या विचारानं संपूर्ण परिवाराचा दैनंदिन खर्च बापू-ताई यांच्या निवृत्तीवेतनातून होत असे. कुणालाही अगदी पाच रुपयांची कोथिंबीरही आणावी लागली नाही. स्व-कुटुंबासाठी लागणारा कपडालत्ता, इतर वस्तू, पार्ट्या, वर्षातून होणाऱ्या एक-दोन सहली यासाठीचा खर्च मात्र जो तो आपल्या कमाईतून करत असे. सुमन आत्या सर्वांची लाडकी. आपल्या भाचरांचे हट्ट पुरविण्यात ती सदैव अगदी आघाडीवर असे.

बापू-ताईंच्या लग्नाचा पन्नासावा वाढदिवस आणि हा सुवर्णयोग साधून येणारी बापूंची पंचाहत्तरी आणि ताईंची एकाहत्तरी तीन मुलांनी सर्व प्रकारे पुढाकार घेऊन अतिशय सुरेख साजरी केली. एकूण सगळं आयुष्य दृष्ट लागण्यासारखं चाललं होतं. दोन-चार वर्षे सुरळीत पार पडली. आजकाल बापू वरचेवर मला खूप थकवा वाटतो अशी तक्रार करत असत. त्यांच्या सगळ्या लहान-मोठ्या चाचण्या झाल्या. या वैद्यकिय चाचणीमध्ये बापूंना थोडी शुगर वाढल्याचे लक्षांत आले. पण या वयात या शुगरची काळजी करण्याचे कारण नाही असे डॉक्टरांचे मत पडले. योग्य औषधं सुरूही झाली. पण बापूंचा अशक्तपणा दर दिवशी वाढतच होता. अधूनमधून तापही येऊ लागला. या साऱ्याच्या जोडीला खोकल्याची बऱ्यापैकी साथ होती. कोणत्याही औषधाने फरक पडेना म्हणून काहीशी जोखीम पत्करून छातीचा ठराविक भाग पंक्चर करून आतील द्रवाची चाचणी केली. नेमके दुखणे कळले, पण आता खूप उशीर झाल होता. ही चाचणी आधी का केली नाही असा सल प्रत्येकाला वाटू लागला. पण अखेर नियतीपुढं कुणाचं काहीही चालत नाही हेच खरं ! दाहसंस्कारानंतर बापूंचे क्रियाकर्म अगदी यथासांग पार पडले. परिवाराच्या दोन भक्कम खांबांपैकी एक खांब उन्मळून पडला होता. ताई उसनं अवसान गोळा करण्याचा प्रयत्न करत होत्या, पण जणू त्यांचं मन आणि शरीर लकव्याने गलितगात्र झाल्यासारखं ताईंना वाटत होतं.

आता तुमचं तुम्ही बघा. पूर्वीप्रमाणे सर्व पुढाकार घेऊन मी परिवार समर्थपणे सांभाळू शकेन असं मला सध्या तरी वाटत नाही. काळ हेच औषध असतं. पण क्षुल्लक कारणावरून आर्थिक वाद होऊ नयेत, म्हणून परिवाराचा पूर्वीप्रमाणे दैनंदिन खर्चाचा भार मी उचलू शकेन हे सांगायला ताई विसरल्या नाहीत. या त्यांच्या वाक्यावर नियती निश्चितच कुत्सितपणे हसली असणार. जग सोडून माणूस निघून गेला तरी मागं राहणाऱ्यांना सर्व कायदेशीर बाबींची पूर्तता करावीच लागते. त्यासाठी अनेक कागदपत्रे जमवावी लगातात. बापू अत्यंत शिस्त असलेली व्यक्ती, त्यामुळे त्यांनी सर्व आवश्यक कागदपत्रं स्वतंत्र फाईलमध्ये ठेवलेली होती. बापूंच्या कपाटातून ताईंनी फाईल काढली. फाईल उघडली, मात्र बापूंच्या हस्ताक्षरांत लिहिलेल्या 'इच्छापत्र' या शीर्षकाखाली असलेल्या मजकूरावर ताईंचे डोळे खिळून राहिले. आपल्याला अंधारात ठेवून, जराही विश्वासात न घेता बापूंनी हे सर्व लिहिले याचा ताईंना फार मोठा धक्का बसला. पण आता नव्याने निर्माण होणाऱ्या परिस्थितीला सामोरे गेलेच पाहिजे असं मनाला बजावून ताई शांतपणे बापूंचं इच्छापत्र वाचू

लागल्या. बापूंनी लिहिलं होतं – ‘हे माझं मृत्युपत्र नसून इच्छापत्र आहे. यात व्यक्त केलेली इच्छा चुकीची किंवा अन्यायकारक वाटू शकेल, पण तरीही माझी इच्छा तुम्ही पूर्ण करावीत अशी तुम्हा सर्वांना कळकळीची विनंती आहे. जो आर्थिकदृष्ट्या दुर्बल त्याच्यामागे असते नेहमीच माझे पाठबळ. आम्ही चार भाऊ. दोन नंबरच्या भावाची आर्थिक स्थिती बेताची होती. मी त्याला वरचेवर पैसे देत असे आणि या माझ्या कृतीला तुमच्या आईने कधी विरोध केला नाही. सुरेश, रेखा, सुमन या तिघांनाही निवृत्ती वेतन मिळेल. सुयशचा स्वत:चा व्यवसाय असल्याने त्याला निवृत्ती वेतन मिळणार नाही. आम्हा दोघांच्या माघारी सुरेश–रेखा नवं शानदार घर बांधून राहू शकतील, पण सुयशला ही गोष्ट सहजासहजी जमणार नाही. त्यामुळे हे घर मी सुयशच्या नावावर करत आहे. गेले काही दिवस झपाट्याने ढासळत जाणारी माझी प्रकृती, आता हे जग सोडून जाण्याचा क्षण जवळ येत चालला आहे याची जाणीव करून देत होती, म्हणून तातडीने मी हे इच्छापत्र लिहिले.

हे सर्व वाचत असताना ताईंच्या मनांत विचार आला, मी मागे राहणार याची पक्की खात्री झाल्यानंतर बापूंनी त्यांच्या पश्चात हे घर माझे आणि माझ्या मृत्युनंतर हे घर सुयशच्या नावे होईल असं न लिहून खरंतर माझ्यावर फार मोठा अन्याय केला आहे. पण आता काहीच इलाज नव्हता. त्यामुळे हा विचारही मागे टाकून ताई पुढे वाचू लागल्या.

हे घर केवळ सोयीसाठी मी सुयशच्या नावे करत आहे, पण हे घर त्याला विकता येणार नाही. घर विकायचे ठरल्यास त्याला करावी लागलेली घराची देखभाल, बारीक मोठी दुरुस्ती, आवश्यक रंगरंगोटी यासाठी सुयशने खर्च केलेली रक्कम वजा जाता उरलेली रक्कम सुयशने सुरेश किंवा त्याचे वारस, सुमन हयात असल्यास तिला आणि स्वत: सुयश किंवा त्याच्या वारसांना समान वाटून घ्यावी. यासाठी कोणत्याही प्रकारे वाद उद्‌भवू नये म्हणून प्रत्येकाने या इच्छापत्राची प्रत/खरी नक्कल स्वत:कडे ठेवावी. आणि आपल्या वारसांना/ मुलांनाही याची स्पष्ट कल्पना द्यावी. या मजकुरावरून डोळे फिरत असताना बापूला, एका मुलाला पूर्ण झुकतं माप दिलं आणि इतर दोन मुलांवर शंभर टक्के अन्याय निश्चितच केला नाही या मनात आलेल्या विचाराने ताई काहीशा शांत झाल्या. पुढच्या आठ–दहा ओळीत इच्छा पत्र संपलं. हे इच्छापत्र मुलांना तातडीने दाखवावं की कांही दिवस जाऊ द्यावेत या संभ्रमावस्थेत ताईंनी फाईल बंद केली आणि दोन दिवसांनी येणाऱ्या रविवारी मुलं–सुना यांना हे इच्छापत्र वाचायला द्यायचं या निर्णयाप्रत ताई आल्या. लग्न होऊन सुजाता या घरी आली. त्यावर बारा वर्षाचा काळ लोटलेला होता. अहंमन्य, स्वार्थी आणि सफाईने खोटे बालणारी सुजाता आता या घराची मालकीण होणार म्हणजे हे घर निश्चितपणे फुटणार याची ताईंना मनोमन खात्री पटली. एक निराशेचा सुस्कारा सोडून ताईंनी फाईल कपाटात ठेवली.

रविवारी सगळीजण नाष्टा करत असताना, ताईंनी सांगितलं, ‘अरे नाष्टा झाल्यावर सगळेजण बाहेर हॉलमध्ये चला. तुमच्या बापूंनी लिहिलेलं इच्छापत्र वाचायचं आहे. मलाही त्यांनी इच्छापत्र लिहिल्याचं माहित नव्हतं. दोन दिवसांपूर्वी सहज त्यांची कागदपत्रांची फाईल पाहताना मला आढळलं. अगदी छोटं आहे. चार–पाच मिनिटांत वाचून होईल.’ एकदम साऱ्यांच्या चेहऱ्यावर कांहीसा तणाव आला आहे असं ताईंना वाटलं. इच्छापत्रातील सुरुवातीचा मजकूर ऐकताना सुयश काहीसा संकोचल्यासारखा झाला होता, तर वयाच्या केवळ पस्तीस वर्षानंतर एवढी प्रॉपर्टी आपल्या नांवे होत आहे हे पाहून सुजाताच्या चेहऱ्यावरून आनंद अगदी ओसंडून वहात होता. पण हे घर विकता येणार नाही आणि विकलं तर कायकाय करायचं हे सर्व ऐकून सुजाता फणकारली.

‘याला काय अर्थ आहे? एकदा घर आमच्या नावे झालं की संपलं. आम्ही ते घर विकू, दुसऱ्याला देऊ किंवा पाडून टाकून तिथं फ्लॅट बांधू.’ सुजाताला थांबवत ताई म्हणाल्या, ‘घर पाडून तिथं फ्लॅट किंवा सदनिका बांधल्या तर नेमक्या कोणत्या आणि कुठल्या प्रकारे कार्यवाही करायची, याबाबतही

इच्छापत्रांत सविस्तर लिहिले आहे. याबाबतची माहिती ताईंनी वाचून दाखवली. तसेच प्रत्यक्ष जर सदनिका बांधण्याचा विचार सुरू झाला तर कोणत्या वकिलाकडून कायदेशीर मार्गदर्शन घ्यायचे त्याचाही उल्लेख इच्छापत्रात होता.

बापूंनी पुढे लिहिले होते – 'घर सुयशच्या नावावर असले तरी तुमच्या आईचे जीवमान असेतोवर सर्वांनी पूर्वीप्रमाणेच एकत्र रहावे. तुमच्या सर्वांच्या मानसिक आधारावर ताई स्वत:ला लौकर सावरेल आणि पूर्वीसारखीच घरासाठी नेटाने उभी राहील.'

ताईंच्या गळ्यांत हुंदका दाटला. काही क्षण विलक्षण शांतता पसरली. या शांततेचा भंग करत सुजाता बोलली. 'आता मात्र अति झालं. घर आमच्या नावावर आहे. घरात कुणी रहायचं आणि कुणी नाही याबाबत निर्णय घेण्याचा अधिकार सर्वस्वी माझा आणि सुयशचा आहे.' घशातला आवंढा गिळत आणि भरले डोळे पुसत ताई म्हणाल्या, 'सुजाता थोडी थांब. इतकी उतावळी होऊ नको. अजून इच्छापत्राचे पूर्ण वाचन झालेले नाही.' पुढे ऐका – 'माझी पत्नी आणि माझी अविवाहित कन्या सुमन, जिने या घराच्या उभारणीसाठी खूप मोठा वाटा उचललेला आहे. या दोघींनाही त्यांच्या आयुष्याच्या अखेरपर्यंत या घरांत राहण्याचा पूर्ण अधिकार आहे. या घरांत राहण्यापासून खुद्द, सुयश, सुजाता किंवा इतर कोणीही अडवू शकणार नाहीत किंवा प्रतिबंध करू शकणार नाहीत. इच्छापत्रावर स्वत: बापूंची आणि साक्षीदार, डॉक्टर इत्यादी सर्वांच्या सह्या होत्या.

आता काय संपलच सारं असे भाव चेहऱ्यावर बाळगत सुजाता उठली आणि खोलीकडे जायला निघाली. पण पुन्हा मागे वळली आणि विमनस्कपणे बसलेल्या सुयशला म्हणाली, 'हे बघा, उद्याच्या उद्या बापूंचं हे मृत्युपत्र की इच्छापत्र त्याच्या पुरेशा प्रति काढा. त्यापैकी एक प्रत घेऊन लगेच आपल्या सोसायटीत जा. या प्रतीसोबत बापूंचे नाव काढून तुमचे नाव या घराला लागण्यासाठी अर्ज द्या. तसेच त्या अर्जात तुमच्या पश्चात माझे नाव घराला लागावे अशी नोंद करून ठेवा. ज्यामुळे आता ताईंच्यावर वेळ आली तशी वेळ माझ्यावर येणार नाही असं म्हणत सुजाता गर्रकन वळून खोलीत गेली आणि धाडकन् दरवाजा लावून घेतला. बापूंनी ताईच्या नावावर घर केलं नाही, पण सारासार विचार करून ते घर सुयशच्या नावे करण्यामागची बापूंची भावना कळून घेण्याची कुवत सुजातामध्ये नव्हती. काही क्षण शांततेत गेले. त्यानंतर सर्वजण हॉलमधून पांगली. सुरेश गाडी घेऊन बाहेर पडला. फाईल कपाटात ठेवून ताई स्वयंपाकघरात जाण्यापूर्वी ताईंनी सुयशच्या पाठीवर थोपटल्यासारखे करून त्याला धीर दिला आणि मी आहे असा नि:शब्द संदेशही स्पर्शातून सुयशला दिला.

दिवस, आठवडे एकामागोमाग एक धावत होते. कुणी कुणाशी फारसं बोलत नव्हतं. एकमेकाशी संवाद साधण्याचा दुवा ताई होत्या. ताईंनी अगदी भरल्या डोळ्यांनी आणि हात जोडून सर्वांना बापूंच्या इच्छापत्रावर कोणत्याही प्रकार चर्चा न करण्याची केलेली विनंती सर्वजण अमलात आणत होते. सुमन, ताई आणि बापूंची लाडकी लेक. प्रख्यात वकील. सुमन जिल्हा न्यायाधीश झाली, तेव्हा बापूना आकाशही ठेंगणं वाटत होतं. ते सुमनला म्हणाले, 'सुमन, आज तू आपल्या घराण्याचं नाव उज्वल केलस.' मनातला सल ओठावर आणत सुमन म्हणाली, 'बापू, म्हणून तर नियतीनं माझं लग्न होऊ दिलं नाही. नाहीतर माहेरच्या जोडीला सासरचंही नाव उज्वल करण्याची दुहेरी जबाबदारी माझ्यावर आली असती.' उजळ वर्ण, चार–चौघीत उठून दिसेल असं रूप. अभ्यास, खेळ, वक्तृत्व यामध्ये पारंगत. बापू नेहमी म्हणायचे, 'माझ्या सुमनला एखाद्या राजा–महाराजा येऊन मागणी घालेल.' पण सुमनचं बाशिंगबळ इतकं काही दुबळं होतं की ती अविवाहीत राहिली. तिच्या कपाळी बाशिंग बांधण्याची वेळच आली नाही. मुलगी नापसंत करण्यासारखं काहीच नाही, पण पत्रिकाच जुळत नाही. आमचा नाईलाज आहे. तुमच्या मुलीचा जन्म मूळ नक्षत्रावर आहे. तिला सून म्हणून घरी आणण्याला मन धजावत नाही. तिचा वकिलीचा

व्यवसाय नको वाटतो. तिनं स्वतंत्र व्यवसाय न करता नोकरी करावी. ज्याला सुमनचा सक्त विरोध होता.

वयाच्या तेहतिसाव्या वर्षी सुमनला अकल्पितपणे त्याच शहरातील एका प्रतिष्ठित, तडफदार, पस्तिशीच्या उंबरठ्यावर असलेल्या वकिलांनी विवाहासाठी मागणी घातली. परस्पर फक्त सुमनशी न बोलता ते घरी आले. बापूंची भेट घेतली. सुमनशी विवाहाचा मनोदय बापूंना सांगितला आणि कौटुंबिक जबाबदाऱ्यांमुळे आपल्या विवाहाला उशीर झाल्याचे मनमोकळेपणाने सांगितले. घरांत माझी फक्त आई असते. माझ्यापेक्षा मोठ्या चार विवाहित बहिणी, त्यांच्या घरी सुखाने राहतात. वडिलांच्या अकाली मृत्यूमुळे स्वत:बद्दल विचार करायलाही माझ्याकडे सवड नव्हती. मी अनेक वेळा सुमनला कोर्टात तिच्या अशिलाची बाजू विलक्षण हुशारीने मांडताना पाहिले आहे. बाररूममधील त्यांचे वर्तन आणि सहकाऱ्यांकडून सुमनविषयी माहिती मिळाल्यानंतर मी प्रथमत: सुमनशी बोलून तुमच्याकडे आलो आहे. माझ्याबद्दल सर्व माहिती मिळाल्यानंतर तुमच्याकडून मला होकार नक्कीच मिळेल अशी माझी खात्री आहे. मला पत्रिका वगैरे काहीही पहायचे नाही. हा फेब्रुवारी महिना चालू आहे. मे महिन्यात कोर्टाला सुटी असते. त्या महिन्यात अगदी साधेपणानं विवाह करावा असं म्हणून मी येतो असं म्हणत सुबोध वकील उठले.

बापू भानावर आले. अहो थांबा, चहा घेऊन चला. सुमन ट्रेमधून बापूंसाठी चहा आणि सुबोधसाठी कॉफी घेऊन आली. ते चहा घेत नाहीत. या सुमनच्या वाक्यावर बापू दिलखुलास हसले. चला वधू-वरांनी एकमेकांना पसंत केलेच आहे, तेव्हा आता आम्ही म्हणजे 'मिया-बिबी राजी तो क्या करेगा काजी?' असं म्हणत बापू खळखळून हसले.

बाहेर वसंत फुलला होता आणि बापूंच्या घरांतील अणूरेणू चैतन्यमय होता. गुढी पाडव्यानंतर साखरपुडा कसा करायचा, कुठं करायचा याचे बेत चालले होते आणि एखाद्या बॉम्बसारखी सुबोध आणि त्याच्या आईचा भीषण अपघातात बळी गेल्याची बातमी येऊन कोसळली. डोळ्यातल्या अश्रूसकट सर्व गोष्टींच्या ठिकऱ्या उडाल्या. सुमनने बापूंना सांगितले, 'आता येथून पुढे माझ्या लग्नाचा विषय पूर्णपणे बंद. हेच माझं घर. माझं जगणं-मरणं या घरासाठीच.' यानंतर सुमनने मागे वळून पाहिलं नाही. सदैव प्रगतीचं नवं क्षितिज - पण आता तिच्या प्रत्येक कृतीला दुजोरा देणारे तिचे बापूही तिच्याबरोबर नव्हते. आईला कधीही अंतर देणार नाही आणि आईचं-ताईचं जीवमान असतोवर हे घर एकसंघ ठेवेन हा बापूंना दिलेला शब्द पाळण्यासाठी सुमन सर्वतोपरी प्रयत्न करत होती आणि त्याच वेळी सुजाता सुमनसकट सर्वांचा भ्रमनिरास करण्यासाठी जागोजागी सुरुंगांची पेरणी करत होती.

(क्रमश:)

**- सौ. कमला हर्डीकर,**
मोबा. ९६८९३६९९२६



**दिनविशेष (जुलै २०२४)**
**ज्येष्ठ-आषाढ १९४६**
**शोभननाम - क्रोधीनाम संवत्सरे**

**सौजन्य : श्री महालक्ष्मी दिनदर्शिका**
**श्री महालक्ष्मी दिनदर्शिका जिथे जिथे।**
**साक्षात लक्ष्मी वसे तिथे।**

**सोमवार दि. १ :** महाराष्ट्र कृषी दिन, डॉक्टर्स डे, **बुधवार दि. ३ :** संत निवृत्तीनाथ पुण्यतिथी, **शुक्रवार दि. ५ :** अमावास्या, **शनिवार दि. ६ :** श्री टेंबेस्वामी पुण्यतिथी, जागतिक सहकार दिन, **रविवार दि. ७ :** श्री जगन्नाथ रथयात्रा पुरी, **गुरुवार दि. ११ :** जागतिक लोकसंख्या दिन, **बुधवार दि. १७ :** देवशयनी आषाढी एकादशी (चातर्मासारंभ), **शुक्रवार दि. १९ :** महाराष्ट्रीय बेंदूर, **रविवार दि. २१ :** गुरुपौर्णिमा, **मंगळवार दि. २३ :** भारतीय श्रावण मासारंभ, लोकमान्य टिळक जयंती, **बुधवार दि. २४ :** संकष्ट चतुर्थी (चंद्रो. ९.४२), **रविवार दि. २८ :** जागतिक निसर्ग संवर्धन दिन.

# माझी बँकेतील मुशाफिरी

## (एका बँक अधिकाऱ्याचे विलक्षण अनुभव)

बँकांमध्ये दर तीन वर्षांनी बदल्या होत असतात. दर तीन वर्षांनी नवी विटी नवे राज्य ! तशीच माझी बदलीही एका खेडेगावात झाली. शहरातून खेडेगावात ! बँकेतील कामकाज विशेषतः कर्ज व्यवहार पूर्ण वेगळा झाला. जेथे मी आयात निर्यात व्यापार संभाळायचो, विदेशी चलन मोजायचो, तेथे आता म्हशीचे तोंड उघडून तिच्या दातांवरून वय ठरवायचे आणि ती खरेदी करायची की नाही हे ठरवायचे ! बकऱ्या, त्यांच्या तंगड्या धरून उचलायच्या, निरोगी आहेत ना बघायच्या आणि त्यांना खरेदी करायला अर्थसाहाय्य करायचे ! पिके /भाजीपाला मळा यांना कर्जपुरवठा करायचा वगैरे वगैरे.

मी तर शहरात जन्मलो, वाढलो, मोठा झालो, खेडेगावाचा मला काहीच अनुभव नव्हता. एखादी भाजी जमिनीवर उगवते की जमिनीखाली हेही माहित नव्हतं. विहिरींमधून मी कधी पाणी ओढले नव्हते. कंदील लावून रात्र कंदिलाच्या प्रकाशात काढायची असते हे माहित नव्हते. खरे म्हणजे विजेचा अभाव माझ्या कल्पनेत पण नव्हता. चुलीवर स्वयंपाक मी कशी बघितलाच नव्हता. खेडेगावांत बदली हा एक पूर्ण नवीन अनुभव होता !

खेडेगावांत बँक व्यवस्थापक म्हणजे एक दादा माणूस समजला जातो. सगळीकडे मान, सगळीकडे प्राधान्य! १५ ऑगस्टला ध्वजरोहणाच्या वेळी प्रथम मान, कुठल्याही समारंभात, शाळेतील कार्यक्रम किंवा लग्नकार्यात प्रमुख पाहुणे म्हणून मिरवायचे, पोपटी पार्टीच्या वेळी खास बोलावणे इ. इ. याउलट व्यवस्थापकाचे आर्थिकदृष्ट्या खूप नुकसान होते. एकतर खेडेगावात पगार कमी मिळतो. दुसरे म्हणजे गावात शिक्षणाची चांगली सोय नसते त्यामुळे कुटुंबाला हलवता येत नाही. म्हणजे दोन ठिकाणचा खर्च, एक शहरातला आणि दुसरा खेडेगावातील. शिवाय महिन्या दोन महिन्यात शहरात घरी जावेसे वाटे त्याचा खर्च ! आणखी गावात एकटे राहावे लागते, स्वतःच्या स्वतः स्वयंपाक करावा लागतो, कपडे धुवावे लागतात, भांडी घासावी लागतात. आजारी पडले तर देखभाल करणारे कुणी नसते. शेवटी खेडेगावात रुजू होणे क्रमप्राप्त होते. त्यानुसार मी रुजू झालो. बहुतेक शहरी बाबू, अशा वेळी जिल्हा किंवा तालुका ठिकाणी राहण्याकरता घर घेणे पसंत करतात, जेथे थोडेफार शहरी वातावरण असते, सोयी असतात आणि रोज खेडेगावात ये-जा करतात. पण मात्र हा रोजचा प्रवास कशाला करायचा, घरी तर जायचे नाही आहे असा विचार करून मी गावातच राहणे पसंत केले. शाखेपासून फक्त पाच सात मिनिटे अंतरावर.

शाखाप्रमुख हा जवळ जवळ गावातील शाखेचा राजाच असतो. हेड ऑफिसचा काहीच जाच नसतो कारण फोन व्यवस्था बहुतेक वेळा संपर्क क्षेत्राच्या बाहेर असते. पण हेड ऑफिसचे मार्गदर्शनही मिळत नाही. आपल्या समस्या आपणच सोडवावयास लागतात.

पहिली समस्या रोख रकमेची. कधी कधी बँकेच्या तिजोरीतील कॅश संपते. शहरातून कॅश यायला वेळ लागणार असतो. पण ग्राहकांची तर पैसे काढण्याकरता रांग लागली असते. अशावेळी गावातल्या एखाद्या मोठ्या व्यापाऱ्याकडून रोख रक्कम घेऊन पेमेंट करावी लागतात. या रक्कमेचा कुठे लिखापढीत उल्लेख करायचा नसतो, तर शहरातून कॅश आल्यावर ही रक्कम परत करायची असते. या व्यवस्थेचा उल्लेख कुठल्या मॅन्युअलमध्ये असतो? दुसरी समस्या वसुलीची ! ग्रामीण भागात खूप कमी कर्जदार बँकेत येऊन हप्ता भरतात. वसुलीकरता त्यांच्या घरी जावे लागते. शेतकरी सकाळी सूर्योदयाबरोबर शेतावर जातो तो दिवेलागणीला परत

येतो. शेतावर जायला गाडीरस्ता नसतो. मग त्याला घरीच गाठणे जरुरीचे असते, एकतर लवकर सकाळी किंवा संध्याकाळी.

सकाळी लवकर जाणे शक्य नसल्याने मी नेहेमी संध्याकाळी जायचो. रोख पैसे वसूल करून सही शिक्क्यासकट पावती द्यावी लागे. दुसऱ्या दिवशी बँकेत पैशाचा भरणा करायचा. हे कुठल्या मॅन्युअल मध्ये आहे? तिसरी समस्या नॉन बँकिंग दिवसाची. रिझर्व्ह बँकेने बँकांच्या सर्व ग्रामीण शाखांना, रविवार व्यतिरिक्त आणखी एक आठवड्यातील एक दिवस सुट्टी म्हणून जाहीर केला आहे. त्यादिवशी ग्राहकाकरीता बँक बंद असते, पण स्टाफकरता नव्हे. त्यादिवशी कर्मचाऱ्यांनी हिशेबाची जास्तीची कामे उरकावीत, वसुलीकरता गावात फिरावे हे अपेक्षित आहे. पण बहुतेक ठिकाणी या नॉन बँकिंग दिवसाचा गैरवापर होतो. स्टाफ संगनमताने आळीपाळीने यादिवशी कामावर येत नाही आणि त्याच्या गैरहजेरीची रजा म्हणून नोंद होत नाही ! मी मात्र अशा प्रकारचा गैरव्यवहार पूर्ण बंद केला. कर्मचाऱ्यांनी सुरुवातीला थोडी कुरकुर केली पण नंतर मात्र सगळ्या गोष्टी सुरळीत झाल्या.

काही वेळा नियमाच्या बाहेर जाऊन काम करावे लागते. एकदा बँक बंद होऊन मी कुलूप लावत होतो, तेव्हा धावत धावत, धापा टाकत एक ग्राहक आला. त्याच्या घरी आदल्या दिवशी दरोडा पडला होता. सगळ्यांना खूप मारहाण झाली होती. त्याच्या बायकोच्या डोक्यावर जबर घाव पडले होते आणि जीव वाचवण्यासाठी तातडीची शस्त्रक्रिया करणे जरुरीचे होते. त्याच्याकरता रु. ६००००/- आवश्यक होते. त्याच्या खात्यात तेवढे पैसे होते आणि ते काढण्याकरता तो आला होता. पण बँक तर बंद झाली होती. कॅशियर घरी गेला होता. पण परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन मी बँक परत उघडली. कॅशिअरला त्याच्या घरातून परत बोलावले, तिजोरी उघडून त्याच्या खात्याला पैसे डेबिट करून मी त्याला पैसे देऊन टाकले. असे लेट पेमेंट नियमात बसत नाही पण माझ्या जबाबदारीवर करून ते करून टाकले. शस्त्रक्रिया यशस्वी झाली. गाहकांच्या बायकोचे प्राण वाचले. ग्राहक बँकेबद्दल इतका कृतज्ञ राहिला की त्याने नंतर बँकेत रु. ६ लाख मुदत ठेवीत ठेवले !

आमची शाखा ग्रामीण भागात ज्या भागात होती त्याच्या एका पट्ट्यात हॉलंडसारखे हवामान होते. काही उद्यमशील शेतकऱ्यांच्या मनात असे आले की तेथे गुलाबाची शेती करायची आणि येणारे गुलाब तेथेच एक हेलिपॅड बांधून थेट युरोपला विमानाने निर्यात करायचे. मग त्यांनी त्या भागातील शेती विकत घ्यायला सुरुवात केली. जवळ जवळ पाच-सहा कोटी खर्च करून त्यांनी दहा-बारा शेतकऱ्यांकडून जमीन विकत घेतली. प्रत्येक शेतकऱ्याच्या हातात रु. ५० ते ६० लाख रु. आले.

वरील सगळा व्यवहार आमच्या बँकेच्या माध्यमातून झाला होता आणि प्रत्येक शेतकऱ्याच्या बचत खात्यात हे पैसे जमा झाले होते. सर्व-साधारणपणे शेतकऱ्यांकडे अर्थ नियोजनाचा पूर्ण अभाव असतो. एवढी रक्कम हाती आल्यावर प्रथम शेतकरी एक बुलेट विकत घेतो, खूप मोठे घर बांधतो, अशा रीतीने सर्व पैशाची चक्क उधळपट्टी करतो आणि त्याची दैन्यावस्था वापस ! परत ज्या शेताचा तो मालक होता तेथेच मजुरी करायला तयार! आणि कमरेला पैसे शून्य ! मला प्रामाणिकपणे असे वाटत होते की हे कुठेतरी थांबायला हवे. मी या सगळ्या शेतकऱ्यांना त्यांच्या बायकांबरोबर बँकेत बोलावून घेतले. प्रत्येकाची खोल चौकशी केली. सुचवले- अमूक एक पैसे तुम्ही मुलीच्या लग्नाकरता बाजूला ठेवा, त्याची मुदत ठेव करा, अमुक एक पैसे तुम्ही मुलाच्या शिक्षणाकरता बाजूला ठेवा, त्याची मुदत ठेव करा, इतके पैसे तुमच्या म्हातारपणाकरता वेगळे ठेवा इ. इ. असे पूर्ण आर्थिक नियोजन करून दिले. बहुतेकांना ते पटलेही. मग त्यांच्या संयुक्त नावाने - नवरा आणि बायको - यांच्या नावाने वेगवेगळ्या मुदत ठेवी बनवल्या. अशा रीतीने बँकेला ठेवी तर मिळाल्याच पण पैसे फालतू खर्च झाले नाहीत. शिवाय दोघांच्या नावाने पैसे ठेवल्याने

बायकोच्या नकळत नवऱ्याला पैसे काढता येईनात. त्याच्यावर अंकुशच आला म्हणाना ! सर्व महिलांनी मला खूप दुवा दिला !

वरील विवेचनावरून लक्षात येईल की बँकरला नुसत्या आपल्या कामापुरता मतलब असू नये तर थोडीशी सामाजिक जाणीव असावी. त्यामुळे काम करताना खरे समाधान मिळते. शिवाय योग्य त्या प्रसंगी नियमाबाहेर सुद्धा काम करावे लागते. सरते शेवटी जाता जाता एक विनोदी किस्सा !

आमच्या गावात एक ताडीचे दुकान उघडले होते. ताडीच्या दुकानाला वार्षिक लिलाव पद्धतीने चालवायला परवानगी मिळते. हा लिलाव होतो महात्मा गांधी मेमोरियल हॉलमध्ये!

हा ताडीचा दुकानदार बँकेत खाते उघडायला आला. तत्कालीन नियमानुसार बँक खाते उघडण्यासाठी एक ओळखदार लागायचा, ज्याचे खाते बँकेत आधीपासून असले पाहिजे. मी दुकानदाराला तसे सांगितले.

दुकानदार : साहेब, कोणाची ओळख आणू?

मी : अरे, जो तुला ओळखतो त्याची.

दुकानदार : साहेब, सरपंच, ग्रामसेवक, मास्तर, तलाठी, पुजारी – सगळेच माझ्या दुकानावर येतात. तुम्ही सांगाल त्याची ओळख आणतो ! तुम्ही पण येत चला. तुम्हाला पेशल देईन.

यावर मी काय बोलणार? अर्थात आता माझ्या लक्षात नाही, पण कुणाची तरी ओळख घेऊन खाते उघडले!

काही वेळा काही अविश्वसनीय अनुभव पण येतात. एकदा एक जख्ख म्हातारा माणूस बँकेत आला. मळके कपडे, धोतर आणि मुंडासे, दाढी वाढलेली, लटपटत चालत होता, अनवाणी, बँकेच्या बाहेर पायताण ठेऊन आला होता आणि पाठीवर एक गोण ! त्याच्याकडे बघून मला अगदी करुणा वाटली. तेवढ्यात बँकेचा चहावाला पण चहा घेऊन आला होता, मी म्हातारबाबांना खुर्चीवर बसवले, चहा पाजला, आणि विचारले की 'बाबा, काय काम आहे.' बाबा म्हणाले, 'मला बँकेत पैसेजमा करायचे आहेत.'

त्याच्याकडे बघून आम्हा सगळ्यांनाच असे वाटत होते की काहीतरी शंभर दोनशे रुपये असतील. मी सांगितले की माझ्याजवळ द्या, मी कॅशियरकडे जमा करतो, तुम्ही नका स्वतः उठून त्याच्याकडे जाऊ, पाच दहा मिनिटे जरा खुर्चीत आराम करा.

त्याने माझ्या टेबलावर गोण उलटी केली. त्याच्यामध्ये दोन लाख रुपये होते! म्हणजे काय वेशावरून आपण माणसाची परीक्षा करू नये हे खरे!

एकंदरीत माझे दिवस ग्रामीण शाखेत खूप छान चालले होते !

शब्दांकन : **श्रीकांत शिंत्रे, सौ. ज्योत्स्ना शिंत्रे,**
मोबा. ९९२००५८७०५


### योगवर्गाचे आयोजन

शिवाजी पेठ, मंगळवार पेठ, महाद्वार रोड, अंबाबाई मंदिर परिसरातील नागरिकांसाठी योग विद्याधाम, कोल्हापूर आणि कोल्हापूर चित्पावन संघ यांचे संयुक्त सहकार्याने कोल्हापूर चित्पावन संघ हॉल, गुरुमहाराज वाड्यानजीक, मिरजकर तिकटी, कोल्हापूर येथे रोज सकाळी ६ ते ८ या वेळेत योगासन वर्ग सुरू झाले आहेत. तरी इच्छुक योगसाधकांनी सदर वर्गाचा लाभ घ्यावा. अधिक माहितीसाठी खालील नंबरवर संपर्क साधावा.

**सौ. सिद्धी बकरे – 8275606627,**
**श्री. रोहित गवळी – 9657963475**



**सोने-चांदी मौल्यवान खरेदी !**

# गोखले ब्रदर्स

## सराफी दुकान

**रविवार, दि. 7 : पुष्य नक्षत्र**


आपलं दुकान

**महाद्वार रोडवर, 0231-2546585**


# मुलांचे पान




## » चित्र रंगवा



## ≫ फरक ओळखा



## ≫ ठिपके जोडून चित्र तयार करा



शब्दप्रभुत्त्वाची साक्ष असलेल्या 'ज्ञानाच्या सोपानाची' जीवनगाथा

# ज्ञानसूर्याची सावली

## (लेखांक चौतिसावा)

काकांच्या भेटीचा तो सोहळा, ती दशम्यांची चव या चौघांना कित्येक दिवस पुरली; पण या सगळ्या गोंधळात आपल्याला गुरुगंडा बांधायचा राहिलाय, याची बोच सोपानाच्या मनात कुठेतरी कोपऱ्यात टोचत राहिली होती. सोपानाच्या मनातली ही रुखरुख ज्ञानेशानं बरोबर ओळखली आणि त्यानं ती निवृत्तीदादाच्या कानावर घातली. त्यावर निवृत्ती समाधानानं हसला. ज्ञानेशाला म्हणाला, ''ज्ञाना, मला ठाऊक आहे; पण त्याच्या मनाला ही बोच लागणं माझ्या दृष्टीनं फार महत्त्वाचं आहे. एकप्रकारे ही त्याची परीक्षाच आहे म्हणेनास !'' निवृत्तीदादाचं बोलणं ऐकून ज्ञानेशाला नवल वाटलं, ''म्हणजे? दादा, तू त्याला गंडा बांधणार नाहीस?'' ज्ञानेशानं विचारलंच ! ''तसं नव्हे ज्ञानेशा ! अरे, गुरुगंडा बांधण्याची किंवा मला गुरू करून घेण्याची किंवा शिष्य होण्याची त्याला, सोपानाला, आस्था किती आहे, हे मला तपासायचं आहे. गुरुची त्याच्या मनाला ओढ लागली पाहिजे, तरच तो शिष्य, चांगला शिष्य बनेल. त्याच्या मनात ज्ञान संपादन करण्याची लालसा निर्माण झाली पाहिजे. चांगल्या शिष्याचं हेच तर लक्षण असतं ज्ञानेशा आणि मला तपासायचं आहे की, सोपानात ते लक्षण किती आहे ते !'' निवृत्तीदादाचं बोलणं ऐकून ज्ञानेश्वर काही बोलला नाही; पण सोपानाच्या मनाची वाढलेली तगमग त्याला दिसत होती, जाणवत होती; पण दादाला तसं समजावून सांगणं शक्य नव्हतं. सोपानाची घुसमट आणि दादाचं परीक्षा घेणं ही कोंडी कधी आणि कशी फुटणार, या विचारानं ज्ञानेश्वर सचिंत झाला. आपण यात काहीतरी करावं, असंही त्याला वाटून गेलं; पण निवृत्तीदादानं मनाई केली. त्यामुळे आता जे-जे होईल ते-ते पाहावं, असा विचार करून तो शांत राहिला आणि एक दिवस ही कोंडी अचानक फुटली !

त्या दिवशी भल्या पहाटे निवृत्ती-ज्ञानेश्वर उठले आणि गंगेच्या घाटावर निघाले. ज्ञानेशाचं सहज लक्ष गेलं. सोपानाचं अंथरूण रिकामं होतं. 'एवढ्या भल्या पहाटे हा कुठे गेला?' त्याच्या मनात प्रश्न उभा राहिला. झोपडीबाहेर पडणारी त्याची पावलं थबकली. निवृत्तीच्या ते लक्षात आलं. ''ज्ञाना, का रे थांबलास? काय झालं?'' त्यानं विचारलं. काही न बोलता ज्ञानेशानं सोपानाच्या रिकाम्या अंथरुणाकडे बोट दाखवलं; पण निवृत्तीचा चेहरा शांत होता. त्यानं काही न बोलता बाहेर जायला पाऊल उचललं ! ''दादा... पण सोपाना? आता... या... वेळी?'' ज्ञानेशानं विचारायचा प्रयत्न केला. निवृत्तीनं हातानंच त्याला थांबवलं. दोघं बाहेर पडले.

सृष्टी शांत होती. आकाश निरभ्र होतं. शुक्राची चांदणी लुकलुकत होती. अजून निसर्गाची बाळं उठली नव्हती. खरंतर एरवी पहाटे गंगेच्या घाटावर जाताना निवृत्ती-ज्ञानेश्वर यांच्यात काही संवाद चालायचा; पण आज वाटच जणू मुकी झाली होती. ज्ञानेशाला कळत होतंही आणि नव्हतंही ! दादाला खूप काही विचारावं, असं त्याला वाटलं ! पण त्यानं शांतच राहायचं ठरवलं. बघता-बघता गाव मागे पडलं. कौलारू बैठ्या घरांची सोबत संपली आणि जमिनीवर पडलेल्या, झाडांच्या धूसर सावल्यांची सोबत सुरू झाली. हळूहळू माती ओलसर लागायला लागली. हवेतला गारवा वाढला. वाऱ्याची झुळूक थंड व्हायला लागली. गंगेचा घाट जवळ आला. तशी निवृत्ती-ज्ञानेशाच्या मनाची प्रसन्नता वाढली. आसमंतात नीरव शांतता होती. अगदी नीरव शांतता. असे वाटत होते, की चांदणीच्या लुकलुकण्याचाही आवाज येईल. इतकं

वातावरण स्तब्ध होतं. अचानक त्या नीरव शांतेतला छेदत, त्या स्तब्धतेला भेदत एक आवाज ऐकू येऊ लागला. दोघांचे चालणारे पाय क्षणभर थांबले. त्यांनी कान देऊन तो आवाज ऐकला. घनगंभीर असा तो आवाज होता. तरीही त्या आवाजात एक कोवळी माधुरी होती, तळहातापेक्षा मोठ्या असलेल्या कदंबाच्या कोवळ्या पानाला असते तशी ! त्या आवाजाला एक गगनभेदी नाद होता, आसमंत होता, विलक्षण स्पंदनं होती, वैनतेयाच्या आकाशगामी पंखांना असतात तशी ! गगनमंडळ व्यापून तो आवाज जणू पृथ्वीमंडळ व्यापण्यासाठी अधीर होता. असं सगळं असूनही निवृत्ती-ज्ञानेशाला त्या आवाजात ओळख जाणवत होती. दोघांची पावलं आता भराभरा पडू लागली. तो कुणाचा आवाज आहे, हे ऐकण्याची अधीरता जणू त्या पावलांतूनही व्यक्त होत होती. जसाजसा गंगेचा घाट जवळ यायला लागला, तसतसा तो आवाज अधिक सुस्पष्ट, अधिक घनता असलेला; पण त्याचबरोबर उच्चारांची अधिक पारदर्शकता असलेला झाला. मनाची कवाडं उघडून थेट तो आवाज हृदयापर्यंत पोहोचला. आता तर तो आवाज, त्या आवाजाचा उच्चार, त्यातला मंत्रजप, त्याची स्पष्टता अधिकाधिक गहिरी व्हायला लागली.

निवृत्ती-ज्ञानेश्वर गंगेच्या घाटावर पोहोचले. घाट शांत-शांत होता. कुठेही हालचाल दिसत नव्हती. इंद्रायणीच्या लाटांची हळुवार गाज तेवढी लपक-लपक अशी ऐकायला येत होती. वातावरण एवढं शांत होतं की, चंद्रकिरणांची सुद्धा हालचाल ऐकू यावी; पण या शांततेला भेदतच तो ध्वनी भू-गगनमंडळ व्यापत होता. समोर काहीच दिसत नव्हतं; पण त्या ध्वनीची कंपनं पायाखालच्या वाळूवर येऊन आदळत होती आणि वाळूत उभ्या असलेल्या निवृत्ती-ज्ञानेशांच्या पावलांना ती जाणवत होती. सभोवती फिरणारा वारा ती कंपनं घेऊनच फिरत होता. त्याच्या स्पर्शानं इंद्रायणीचं पाणीही हिंदकळत होतं आणि अविरत आवर्तनांतून निनादणारा तो ध्वनी आकाश व्यापून राहत होता.

ज्ञानेशानं सर्वत्र बारीक नजरेनं पाहिलं. आसपास कुणीच नव्हतं. निवृत्तीनंही सगळीकडे नजर टाकली. कुणीच दिसत नव्हतं; पण ध्वनीचा उगम पाण्यातूनच येत होता. एक लहानसा चुकार ढग चंद्राला झाकोळून होता. काही क्षणांत तो पुढे सरकला. चंद्रबिंब उजळलं आणि त्याचे किरण इंद्रायणीच्या पाण्यावर नाचायला लागले. निवृत्तीचं तिकडे लक्ष गेलं; आणि त्या नाचणाऱ्या चंद्रबिंबाच्या प्रतिबिंबाच्या तरंगात पाण्याचे आवर्त तयार होत आहेत, हे त्याच्या लक्षात आलं. त्यानं स्पर्श करून ज्ञानेशाचं तिकडे लक्ष वेधलं. दोघांची पावलं इंद्रायणीत शिरली. पाण्यातून ध्वनी आवर्तन येत होते.

**''नाहं देहो न इंद्रियाण्यन्तरङ्गोरङ्गो नाहंकार: प्राणवर्गो न बुद्धी: । दारापत्यक्षेत्रवित्तादिदूर: साक्षी नित्य: प्रत्यगात्मा शिवोऽहम् ।। रज्ज्वज्ञानाद भाति रज्जौ यथाऽहिं: स्वात्माज्ञानादात्मनो जीव भाव: । आप्तोक्त्याऽ हि भ्रान्तिनाशे स रज्जुर्जीवो नाहं दैशिकोक्त्या शिवोहम् ।। आभातीदं विश्वमात्मन्यसत्यं सत्यज्ञानानंदरूपे विमोहात् । निद्रामोहात् स्वप्नवत्तन्नं सत्यं शुद्ध: पूर्णो नित्य एक: शिवोऽहम्।।''**

शिवोऽहम्... शिवोऽहम्चे ते आकाशगामी आवर्त, त्या प्रत्येक आवर्ताबरोबर पाण्याचं चाललेलं आवर्तन, त्या आवर्तनाबरहुकूम लाटांचं चाललेलं नर्तन, त्या नर्तनातून उठणारे तरंग, त्या तरंगांतून निर्माण होणारी स्पंदनं आणि त्या स्पंदनांना छेदून स्पष्ट उच्चारवानं केली जात असलेली शिवोऽहम्... शिवोऽहम्ची अद्वैतपंचकाची साधना. त्या शिवोऽहमच्या उच्चारवाला जणू अवघा आसमंत साद देत होता आणि येताना त्या नादाचा प्रतिनाद, त्या ध्वनी उच्चाराचा प्रतिध्वनी घेऊन येत होता आणि त्यामुळेच की काय अवघ्या आसमंतात तो 'शिवोऽहम्' चा ध्वनी भरून राहिला होता. निवृत्ती-ज्ञानेश्वर लक्ष देऊन ऐकत होते. पाण्याला सुद्धा कळणार नाही, अशा पद्धतीने हळुवार पावलं टाकत इंद्रायणीतून पुढे चालले होते. (क्रमश:)

**- सौ. मंजुश्री गोखले,**
मो. ८८०५३५५२००

# सोपानदेवांची 'अलौकिक सोपानदेवी'

ज्ञानेश्वरांनी श्रीमद्भगवद्गीतेवरील भाष्य ज्ञानेश्वरीद्वारा लिहून या महान ग्रंथराजाचा सर्वसामान्यांना परिचय करून दिला हे आपण जाणतो. मात्र ज्ञानेश्वरांपाठोपाठ त्यांचे धाकटे बंधू सोपानदेवांनीही अतिशय सोप्या भाषेत गीतेचा ओवीबद्ध अर्थ सांगितला आहे हे किती लोक जाणतात? गीतेच्या ७०० श्लोकांचे निरूपण ज्ञानदेवांनी सुमारे ९०३२ ओव्यांतून केले आहे. तर सोपानदेवांनी ते अवघ्या ७०४ ओव्यांतून आणि नागर मराठी भाषेत केले आहे. नवस्नेहच्या संपादिका सौ. मंजुश्री गोखले यांनी सोपानदेवी संपादित केली असून आपण ती क्रमशः वाचत आहोत. यात ठळक टाईपात सोपानदेवांची रचना असून त्याखाली विनोबांनी केलेली गीताईतील रचना दिली आहे. **– व्यवस्थापक**

**अध्याय ५ : कर्म संन्यास योग**

**जे अंतरी निवाले आत्मसुखे । बाहेरीच कांही न देखे ।**
**ब्रह्म निर्वाण होउनी विशेषे । ब्रह्मी योगी ऐक्य होती ।।**
प्रकाश स्थिरता सौख्य अंतरीं लाभलीं जया ।
ब्रह्म होऊनि तो योगी ब्रह्म-निर्वाण मेळवी ।।२४।।
**जे ब्रह्मी ऐक्य होती । तयाची कल्मषें नाशती ।**
**द्वैत छेदुनी आत्मस्थिती । सर्व भूती हित देखे ।।**
फिटले दोष शंका हि मुठीत धरिलें मन ।
पावले ब्रह्म-निर्वाण ज्ञानी विश्व-हितीं रत ।।२५।।
**काम क्रोध सहित । विकारे जिंकिले समस्त ।**
**ते ब्रह्म निर्वाण त्वरीत । आनंदी वर्तती ।।**
काम क्रोधांस जिंकूनि यत्नें चित्तास बांधिती ।
देखती ब्रह्म-निर्वाण आत्म-ज्ञानी चहूकडें ।।२६।।
**सर्व इंद्रियें बाहेरिली बाहेरी । धरी भीतरील भीतरी।**
**भरी चक्षु भृवांतरी ।**
**नासाग्री प्राण अपान सम करूनी ठेवी ।।**
विषयांचा बहिष्कार डोळा भ्रू-संगमीं स्थिर ।
करूनि नासिका-स्थानीं प्राणापान हि सारखे ।।२७।।
**आणि इंद्रिये मन बुद्धि । इच्छा भय क्रोध हे जिंकिले**
**आधी । तो मोक्ष परीक्षण शुद्धि ।**
**जीवन मुक्त बोलिजे ।।**
आवरी मुनि मोक्षार्थी इंद्रियें मन बुद्धि जो ।
सोडी इच्छा भय-क्रोध सर्वदा सुटला चि तो ।।२८।।
**यज्ञफळ तयासीच जाले । इहलोकी ईश्वर तयासीच**
**म्हणतिले । सर्व भूतीं मित्रत्व लाधले ।**
**जाणावे ते पावले शांतिपद ।।**
भोक्ता यज्ञ-तपांचा मी सोयरा विश्व-चालक ।
जाणूनि ह्यापरी मातें शांतीस वरिला चि तो ।।२९।।

इति श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुनसंवादे कर्मसंन्यासयोगे । नाम पंञ्जमोऽध्यायः ।।५।। ।। श्रीकृष्णार्पणमस्तु ।।

**कोल्हापूर चित्पावन संघासाठी आपल्या ठेवीची/वर्गणीची रक्कम**
**बँक ऑफ महाराष्ट्र, महाद्वार रोड शाखा**
खात्याचे नाव
**कोल्हापूर चित्पावन संघ**
**(खाते क्र. 20128506183)**
**IFSC Code : MAHB0000326**
**येथे पाठवा व KYC पाठवा. किंवा**
**बँक ऑफ इंडिया, शाखा : महाद्वार रोड,**
खात्याचे नाव
**कोल्हापूर चित्पावन संघ**
**(खाते क्र. 090210110016181)**
**IFSC Code : BKID0000902**
**येथे रक्कम पाठवून KYC पाठवा.**

'नवस्नेह' च्या माध्यमातून आपल्या पाल्याचे विवाह जुळल्यास पालकांनी कृपया याची माहिति कोल्हापूर चित्पावन संघास कळवावी, ही नम्र विनंती.

**वाचकांनी आपले बदललेले पत्ते चित्पावन संघाच्या कार्यालयात किंवा ७६२०५४६२२५ या व्हॉटस् ॲप क्रमांकावर लौकरात लौकर पाठवावेत.**

# सप्त चिरंजीव (सत्य काय?)

## बलीराजा

*अश्वत्थामा बली व्यासो हनुमान बिभिषणः ।*
*कृप परशुरामस्य सप्तते चिरंजीविंना ।।*

संकलक – **श्री. अविनाश बर्वे**

माझ्या स्वतःच्या मनात या सात चिरंजीवांपैकी ज्या व्यक्तिरेखेविषयी सर्वात जास्त कुतुहल आहे, ती म्हणजे 'बलीराजा'. म्हणूनच मी या बलीराजाची काही विशेष माहिती मिळते का? अशी शोधण्याचा प्रयत्न केला. तेव्हा मला कळले की खूप प्रसिद्ध व्यक्तिमत्वांनी यावर विचार केला आहे, वेगळी मते मांडली आहेत. माझे असे कुतूहल वाटण्याचे मुख्य कारण असे की आपण सर्वजण जाणतो की 'बलीराजा' किंवा ज्याचा उल्लेख 'महाबली' असाही केलेला आहे, तो एक प्रजाहितदक्ष राजा, उत्तम प्रशासक, न्यायी होता. त्याच्या राज्यात त्याचे प्रजाजन अतिशय सुखात, समृद्धीत नांदत होते. तो राक्षस कुळात जन्माला आला होता ही जरी सत्य घटना होती, तरीही तो अतिशय आदर्श, अजातशत्रू असा राजा होता. त्याची प्रजा त्याच्यावर खूष होती. हवाहवासा वाटणारा असा तो राजा होता.

आता अगोदर त्याच्या कुळाचा थोडा विचार करूया. कश्यप ऋषि यांना अनेक बायका होत्या. सप्तर्षीमध्ये स्थान मिळालेले कश्यप हे साक्षात ब्रम्हदेवाचे पुत्र होते. ब्रम्हदेवाने त्यांना प्रजापती अशी पदवी दिली होती. ब्रह्मदेवाचा दुसरा पुत्र प्रजापती दक्ष याला अनेक मुली होत्या. यापैकी सतरा मुलींचे लग्न त्याने ऋषि कश्यप यांच्याशी लावले. त्या सर्व पत्नींपासून प्रजापती कश्यपांनी वेगवेगळ्या मानवी आणि प्राणी प्रजातीची निर्मिती केली.

कश्यप ऋषींच्या दोन मुख्य पत्नी होत्या. दिती आणि आदिती. कारण या दोघींपासून मानव निर्मिती झाली. आदितीपासून बारा आदित्य म्हणजे बारा देवता निर्माण झाल्या. दितीपासून दोन जुळे पुत्र – हिरण्याक्ष आणि हिरण्यकश्यपू आणि एक कन्या होलिका अशी संतती झाली.

यापैकी हिरण्यकश्यपू याचा वंशज बली. हिरण्यकश्यपू याचा एक मुलगा भक्त प्रल्हाद. त्याचा मुलगा विरोचन आणि नातू म्हणजे बली, याचा उल्लेख महाबली असाही केलेला आहे. राक्षस कुळात जन्माला येऊन सुद्धा प्रल्हाद हा वेगळाच होता. तो श्रीविष्णूंचा भक्त होता, सदाचारी होता. त्याच्या साहाय्यासाठी स्वतः श्रीविष्णू नरसिंह अवतार घेऊन प्रकट झाले आणि त्यांनी प्रल्हादाचा पिता हिरण्यकश्यपूचा वध करून आपल्या भक्ताचे रक्षण केले ही कथा सर्वांनाच माहिती आहे.

मग त्याच श्रीविष्णूंनी, त्याच प्रल्हादाचा सदाचारी, महादानी, आदर्श, राजा अशा नातवाला वामन रूप घेऊन पाताळात का बरे लोटून दिले असेल? या प्रश्नाचे उत्तर आपल्याला खालील श्लोकात मिळू शकते–

**अति दानात बलि र्बद्धः; अति मानात सुयोधन; ।**
**वि नष्टो रावणो लौल्यात अति सर्वत्र वर्जयेत ।**

या श्लोकात चाणक्याने सांगितल्याप्रमाणे आयुष्यात काहीही अति हे विषासारखे आहे, मग तो चांगला गुण असो की दुर्गुण.

राजा बलीबद्दल याच श्लोकात अति दानी असा उल्लेख आला आहे. उठ सुठ दान देणे हे कसे हानिकारक ठरते, हेच आपल्याला बलीराजाच्या उल्लेखावरून कळते. बलीराजा हा प्रल्हादपुत्र विरोचन याचा मुलगा होता. देव दैत्यांच्या परंपरागत युद्धात विरोचनाला इंद्राने मारले आणि तेही कपटाने. त्याचा सूड म्हणून बलीने राज्यावर आल्यावर स्वतःचे राज्य वाढवले, आणि तेही उत्तम कारभार करून, प्रजेला खूष ठेवून. त्याचे राज्य इतके बलशाली झाले की काही काळानंतर त्याने इंद्रावर स्वारी करून त्याला हरवले. आणि त्याच्या राज्यातून – म्हणजे स्वर्गातून त्याला हाकलून लावले. पुढे इंद्राने विष्णूच्या मदतीने बलीला त्याच्या राज्यातून हाकलून लावले.

या कथेतील देव – दैत्य वगैरे संकल्पना आपण सोडून देऊ. कारण त्याला सत्याचा आधार कितपत आहे

हे मी सांगू शकत नाही. पण मला स्वतःला या गोष्टीतून एवढाच अर्थ घ्यावासा वाटतो की राजा बली हा कपट – कारस्थानाचा एक बळी ठरला. राजा बलीचे राज्य एवढे संपन्न होत गेले की तिथली संपन्नता इतर आसपासच्या राजांना मोहिनी घालू लागली. हे असे संपन्न राज्य आपल्या ताब्यात यावे, इथली साधन संपत्ती आपल्याला मिळावी, या हेतूने आसपासच्या राजांनी बलीवर बरेचदा आक्रमणे केली असावीत. पण त्यात ते पूर्णपणेअसफल झाले, उलट बलीच्या पराक्रमाने त्यांनाच आपले राज्य सोडून परागंदा व्हायची वेळ आली. तेव्हा या इतर सर्व राजांनी मिळून एक कारस्थान रचले आणि कपटाने बलीला त्याच्या राज्यातून हाकलून लावले. वामन हा बहुतेक या कपट कारस्थानाचा म्होरक्या असावा. कोणतेही गुप्त कारस्थान हे सुरुवातीला अतिशय छोट्या स्वरूपात अस्तित्वात येत असते, हे आपण आजही पहातोच. जेव्हा हे कपट कारस्थान यशस्वी होते तेव्हा त्याने विराट रूप धारण केलेले असते. म्हणून वामन हा बली राजाकडे दान मागायला आला तेव्हा बटू – वामन रूपात आला आणि त्याने दान मिळाल्यावर विराट रूपात बली राजाला पदच्युत केले. असा या कथेचा अर्थ मी घेतला. म्हणजेच या वामनाला मुळात राजा बलीने आपल्या दरबारात आश्रय दिला असावा आणि त्याने नंतर कपटाने आपले हातपाय पसरले असावेत आणि राजालाच पदच्युत करून आपण राजपदावर आला असावा.

महात्मा फुले यांनी या कथेचा एक वेगळा अर्थही लावला आहे. तोही विचारात घेण्याजोगा आहे. बलीराजाचे राज्य हे शेतीमुळे संपन्न झाले होते. शेतीमध्ये अनेक प्रकारचे प्रयोग करून राजाने आपले उत्पादन इतके वाढवले की तो अशी विविध प्रकारची उत्पादने आणि अनुषंगाने शेतीची नवीन प्रकारची औजारे आणि इतर काही अनुषंगीक उत्पादनेही इतर देशांना विकू लागला. असे देशही स्वतःची प्रगती होत असल्याने बली राजाचे मित्र होऊ लागले. त्यामुळे बलीराजा संपत्तीबरोबरच मनुष्यबळांमध्येही संपन्न होऊ लागला. दिवसेंदिवस बलीची ताकत वाढू लागली. अनेक उत्तम भूभाग कशानं कशा प्रकारे त्याच्या अधिपत्याखाली येऊ लागले.

या सगळ्या त्याच्या ताकतीमुळे काही राजे चिंतीत झाले. कारण जे देश पूर्वी त्यांचे मित्र होते, त्यांच्या अधिपत्याखाली होते, ते आता बलीराजाच्या अधिपत्याखाली जाऊ लागले, त्याचे मित्र होऊ लागले. अशा राजांना बलीराजा आपल्या राज्यावर आक्रमण करील की काय? अशी भीती वाटू लागली. तर एकीकडे त्याच्या संपन्न राज्याचा मोहही पडत होता. या दोन्ही कारणांनी त्यांनी वामनाला बलीकडे पाठवले, ज्याने राजाचा विश्वास जिंकून घेतला. त्याचे राज्य शासन आतून पोखरले आणि पुढे त्याचे राज्य राजाकडून हिरावून घेतले, राजाला परागंदा व्हावे लागले.

बलीराजाचे गुरु शुक्रचार्य म्हणून ज्यांचा उल्लेख आलेला आहे हा राज्यातला कुणीतरी हुशार चाणाक्ष माणूस असावा. त्याला या कपट – कारस्थानाची कल्पना आधीच आली असावी. त्याने वामनाला विरोध करायचा प्रयत्नही केला. पण बलीचा वामनावर इतका विश्वास बसलेला होता की त्याने शुक्रचार्यांचे काही न ऐकता वामनाला आपल्या दरबारात आश्रय दिला आणि त्यानेच राजाचा घात केला. शुक्राचार्यांचे म्हणणेच खरे ठरले. आणि बलीचे संपन्न राज्य त्याच्या हातून गेले आणि त्याला परागंदा व्हावे लागले.

ही उपपत्तीही पटण्याजोगीच आहे. महात्मा जोतिबा फुले पुढे शेवटी असेही सांगतात की – बलीराजाने ही सगळी संपन्नता शेतीत वेगवेगळे प्रयोग करून, उत्पादन वाढवून मिळविलेली होती. म्हणून आजही शेतकऱ्यांना बळीराजा असेच नामनिधान मिळालेले आहे.

जोपर्यंत आपल्या देशात शेतकरी शेती करत राहणार आहे तोपर्यंत त्याला बळीराजा म्हटलेही जाणारच आहे. याही अर्थाने आणि इतिहासात पडलेला पहिला कपट कारस्थानाचा बळी याही अर्थाने बळीराजा चिरंजीव झालेला आहे, असेच आपण म्हणू शकतो. जोपर्यंत शेतीची संस्कृती या पृथ्वीतलावर नांदणार आहे, तोवर बळीराजाच्या रूपाने राजा महाबली पृथ्वीवर चिरंजीवच रहाणार आहे.

बलीला चिरंजीवीत्वाचा वर कलियुगाच्या अंतापर्यंत मिळालेला आहे. प्रत्येक युगाच्या शेवटी हिमयुग येऊन पृथ्वीवरची सर्व संस्कृती नष्ट होते आणि पुढे वेगळ्या स्वरूपात अस्तित्वात येते असे म्हणतात. त्यामुळे कदाचित पुढच्या हिमयुगानंतर शेतीची संस्कृती नष्ट झाली तर बळीराजा हे नावही नष्ट होईल आणि राजा बलीचे चिरंजीवीत्वही संपेल.

(क्रमशः)

**– सौ. ज्योत्स्ना शिंत्रे,**
मोबा. ९९२००५८७०५



# सार्वजनिक काका
# वासुदेव गणेश जोशी

२२ ऑक्टोबर १८७९, पुण्यातील न्यायालयात आलेल्या केसर या न्यायाधीशासमोर अभियोगाला सुरुवात झाली. क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके यांच्यावरील राजद्रोहाच्या आरोपावरून हा अभियोग होता. पुण्यातील असंख्य नागरिक हे पहायला गर्दी करून आले होते आणि हातापायात साखळदंड बांधलेले वासुदेव बळवंत यांना घेऊन पोलीस न्यायालयात आले. आरोपीच्या पिंजऱ्यात इंग्रज शासनाच्या विरोधात मनात फुललेला अंगार आपल्या दृष्टीतून फेकत वासुदेवराव ताठ कण्याने बसले.

न्यायाधीशाने सरकारी वकिलाला विचारले, 'आरोपीच्या वतीने बचाव कोण करणार आहे?' सरकारी वकिलाने शांतपणे सांगितले, 'कोणी नाही.'

होय. सरकारविरूद्ध बंड केलेल्या वासुदेव बळवंतांचा बचाव कोण करणार? हे करणे म्हणजे एक प्रकारे सरकार विरोधात वकिलपत्र घेण्यासारखेच होते. न्यायालयात नि:शब्द शांतता पसरली; आणि तेवढ्यात आपल्या मस्तकावरील लाल पगडी मिरवित आणि अंगावरचे उपरणे सारखे करत त्या गर्दीतून वाट काढत पुढे आले, वासुदेव गणेश जोशी तथा सार्वजनिक काका!

न्यायालयात जाण्यापूर्वी त्यांचे स्नेही म्हणाले होते, 'कशासाठी हे साहस? अहो, वासुदेव बळवंत याने राजद्रोह केला आहे.' त्याक्षणी काका त्यांना म्हणाले,

'काय होईल? वासुदेव बळवंतांबरोबर मलाही फाशी देतील, इतकेच ना? मला चालेल.' हेच ते पुण्यातल तत्कालीन सर्वपरिचित सार्वजनिक काका !

काकांचे मूळ गाव रत्नागिरी जिल्ह्यातील संगमेश्वर जवळचे असलेले कसबा. कसब्यातून पूर्वज सातारा इथे गेले. ९ एप्रिल १८२८ रोजी काकांचा सातारा इथे जन्म झाला. वडील न्यायालयात नोकरीला होते. साताऱ्यातच काकांचे सातवीपर्यंत शिक्षण झाले. पुण्याच्या न्यायालयात १८४८ साली कारकून म्हणून नोकरीला लागले. ७-८ वर्षे नोकरी झाल्यानंतर त्यांनी राजीनामा दिला आणि वकिलीची परीक्षा देऊन वकिली सुरू केली. त्यांना सार्वजनिक कार्याची आवड होती. इंग्रज सरकारकडून सनदशील मार्गाने कांही सुधारणा घडवून आणाव्या यासाठी चैत्र शुद्ध प्रतिपदा २ एप्रिल १८७० रोजी त्यांनी पुण्यात सार्वजनिक सभेच्या कामाला प्रारंभ केला. तत्कालीन कारण होते ते पुण्याच्या पर्वती देवस्थानातील गैरव्यवहार दूर व्हावेत म्हणून. या सार्वजनिक सभेचे अध्यक्ष होते औंध संस्थानचे राजे श्रीनिवासराव पंतप्रतिनिधी आणि कार्यवाह काका !

इ.स.१८७१ साली न्यायमूर्ती रानडे पुणे येथे न्यायाधीश म्हणून आले. न्यायमूर्ती सार्वजनिक सभेला सहकार्य करू लागले. मुंबईला बॉम्बे असोसिएशन आणि कलकत्याला ब्रिटीश इंडियन असोसिएशन या संस्था काम करत. त्याच धर्तीवर पुण्यातील सार्वजनिक सभा काम करत होती. एतद्देशियांना समजावेत म्हणून कायद्याचे भाषांतर त्या त्या भाषेत व्हावे तसेच न्यायालयात हिंदी व्यक्तींची न्यायाधीश म्हणून नियुक्ती व्हावी. नगरपालिकांमध्ये लोकनियुक्त सभासद घेण्यात यावेत अशा अनेक सुधारणा व्हाव्यात म्हणून सार्वजनिक सभा काम करीत होती. काकांची वकिली उत्तम चालत होती. आर्थिक समृद्धी आली तेव्हा त्यांनी मातोश्रींच्या इच्छेसाठी पुण्यात विष्णुमंदिर आणि हौद बांधला.

स्वदेशी चळवळ म्हटले की महात्माजींची सर्वांना आठवण येते. १९०६ साली बंगालची फाळणी झाली आणि देशभर स्वदेशीचा जागर सुरू झाला. परदेशी कापडांची होळी करायला सुरुवात झाली. मात्र पुणे शहरात स्वदेशीची मुहूर्तमेढ रोवली ती सार्वजनिक काकांनी. इथल्या हातांना काम मिळायला हवे, स्थानिक कारागिरांना उपजीविकेचे साधन हवे तर स्वदेशीशिवाय पर्याय नाही. काकांनी निश्चय केला, १२ जानेवारी १८७२ रोजी परकीय तलम वस्त्रांचा त्याग करून काका जाडीभरडी स्वदेशी वस्त्रे वापरू लागले. एवढेच करून ते थांबले नाहीत. घरी टकळीवर सूत काढून घरीच मागावर वस्त्रे विणू लागले. विशेष म्हणजे १८७७ साली व्हिक्टोरिया राणीला भारताची सम्राज्ञी घोषित करण्यासाठी दिल्ली दरबार भरला. भारतातले सगळे संस्थानिक आपले सारे जडजवाहिर घालून आणि राजेशाही दरबारी वस्त्रे परिधान करून राणीला मुजरा करायला आले होते आणि या दरबारात आपल्या घरी मागावर विणलेली स्वदेशी जाडीभरडी वस्त्रे घालून आले होते वासुदेव गणेश जोशी तथा सार्वजनिक काका !

काकांनी राणीसमोर मागणी केली ती भारतीय लोकांना ब्रिटनमधील नागरिकांप्रमाणे राजकीय आणि सामाजिक दर्जा द्यावा. भारतीय शिक्षणात स्वावलंबनाच्या शिक्षणाचा समावेश करावा. ब्रिटनच्या पार्लमेंटमध्ये भारतीय प्रतिनिधी घेण्यात यावेत. काका नुसते वाचावीर नव्हते, त्यांनी स्वत: शाई, साबण, मेणबत्त्या, छत्र्या बनवायला सुरू केल्या. त्याच्या विक्रीसाठी पुणे, सातारा, नागपूर, मुंबई, सुरत इथे दुकाने सुरू केली. इतकेच नाहीतर उत्तर प्रांतात आग्रा इथे कापडाची गिरणी सुरू केली आणि त्यात नुकसानही सोसले. सार्वजनिक सभेच्या माध्यमातून त्यांनी शेतकऱ्यांच्या आर्थिक स्थितीची पाहणी केली.

१८७६-७७ यावर्षी देशभरात प्रचंड दुष्काळ पडला. विशेषत्वाने दक्षिण भारताला मोठ्या प्रमाणात संकटाला सामोरे जावे लागले. दक्षिण भारतात ५२ लाख तर नुसत्या महाराष्ट्रात ८ लाख लोक अन्नावाचून मेले. पुणे भागात यावेळी सावकारशाहीला त्रासलेल्या शेतकऱ्यांनी मोठा उठाव केला. सावकारांची कागदपत्रे जाळणे, त्यांना इजा करणे असे प्रकार सुरू झाले. सार्वजनिक सभेच्या वतीने इंग्रज सरकारला काही उपाय सुचविण्यासाठी काकांनी चौकशी सुरू करून शेतकऱ्यांसाठी कायदा करायला भाग पाडले. त्याचबरोबर दुष्काळ निवारण फंड उभा करून त्यांनी स्वस्त धान्य दुकाने सुरू केली.

दिल्ली दरबारच्या प्रसंगी भारतातली वृत्तपत्रांनी इंग्रजांच्या जुलमी कारभारावर टीकेची झोड उठवली. लॉर्ड लिंटन हा त्यावेळी भारताचा व्हॉईसरॉय होता. कट्टर साम्राज्यवादी असलेल्या लिंटनला वृत्तपत्रांनी केलेली टीका सहन झाली नाही. त्याने भारतीय वृत्तपत्रांवर निर्बंध आणणारा कायदा केला. काकांनी या कायद्याला विरोध केला. मुंबईमध्ये ९ मार्च १८७८ रोजी त्यांनी वृत्तपत्रकारांचे संमेलन आयोजित केले. इतकेच नव्हे तर कलकत्ता इथे झालेल्या अशा संमेलनाला आवर्जून उपस्थित राहिले. काकांप्रमाणेच त्यांच्या पत्नीचा सरस्वतीबाईंचाही सामाजिक कार्यात सहभाग होता. काकांना जातीभेद अमान्य होता. १८७१ साली त्यांनी स्त्री विचारवंती संस्था स्थापन केली. या संस्थेच्या वतीने सरस्वतीबाई सार्वजनिक हळदीकुंकू हा कार्यक्रम करत. या समारंभाला सर्व जातीच्या महिला उपस्थित असत.

आयुष्यभर सतत सामाजिक कार्यासाठी वणवण करणारे गणेश वासुदेव जोशी तथा सार्वजनिक काका हृदयविकाराच्या आजाराने २५ जुलै १८८० साली वारले. काकांच्या कार्याचा सन्मान म्हणून जमविलेल्या निधीतून जागा खरेदी करून सार्वजनिक सभागृह उभारून त्याला काकांचे नाव देण्यात आले. आज बुधवार पेठेतील विजय मारूती चौकात हे स्मारक उभे आहे. काकांच्या पश्चात रानडे गोखले विरूद्ध लोकमान्य असा संघर्ष झाला आणि इंग्रजांनी सार्वजनिक सभेची मान्यता रद्द केली. गेल्याच वर्षी सार्वजनिक सभेचा शतकोत्तर सुवर्ण महोत्सव झाला. नव्या पिढीला चौकात असलेल्या सभागृहाचे नाव दिसते, मात्र काकांच्या सामाजिक कार्याचा फारसा किंबहुना अल्पसाही परिचय नसतो. जर पुण्यात ही स्थिती तर आपल्या रत्नागिरी जिल्ह्यातल्या कसबा संगमेश्वरच्या या सुपुत्राची माहिती तिथल्या लोकांना कुठून असणार? या अपरांताने अशी अनेक नवरत्ने देशाला दिली !

**– प्रकाश देशपांडे**

मोबा. ९४२३८३१६६८

# मुस्लिम स्त्री कलाकार नर्गिस



नर्गिस या सुप्रसिद्ध अभिनेत्रीचे जन्माच्या वेळचे नाव फातिमा रशीद असे होते. तिचा जन्म एक जून १९२९ रोजी कलकत्ता येथे झाला. तिच्या वडिलांचे नाव अब्दुल रशीद असे होते. तिचे वडील मूळ हिंदु होते व त्यांचे नाव मोहनदास उत्तमचंद असे होते. मोहनदास यांनी जेव्हा लग्न केले त्यावेळी त्यांनी मुस्लिम धर्म स्वीकारला व अब्दुल रशीद असे त्यांचे नाव झाले. मोहनदास हे खूप श्रीमंत होते.

नर्गिसच्या आईचे नाव जद्दनबाई असे होते. जद्दनबाई ही गायिका, संगीतकार, अभिनेत्री, नृत्यांगना अशी चतुरस्र गुणांनी संपन्न होती. १९३५ साली आलेल्या तलाशे-हक या सिनेमात नर्गिस बालकलाकार म्हणून चमकली. त्यावेळी तिचे वय सहा वर्षांचे होते. जद्दनबाईने नर्गिसला चित्रपटसृष्टीत आणले.

नर्गिस हा पर्शियन शब्द आहे आणि नर्गिसचा अर्थ फूल असा आहे. अंकशास्त्रानुसार नर्गीस या नावाची व्यक्ती साहसी, मजबूत, दूरदृष्टी असलेली, खर्चिक, स्वातंत्र्यप्रेमी, अस्वस्थ, आध्यात्मिक असते.

१९४३ साली आलेल्या मेहबूब खान यांच्या तकदीर या चित्रपटामध्ये नर्गिसने हिरोइन म्हणून पदार्पण केले. त्यावेळी ती १४ वर्षांची होती व तिच्यासमोर काम करणारा हिरो म्हणजे मोतीलाल. तो ३३ वर्षांचा होता. मेहबूब खान यांना नर्गीसचे मूळ नाव फातिमा हे आवडले नाही म्हणून त्यांनी तिचे नाव नर्गिस असे ठेवले आणि तेच नाव पुढे प्रसिद्ध झाले.

तकदीर या सिनेमातील बहुतेक सर्व गाणी शमशाद बेगम यांनी म्हटली होती. हा सिनेमा खूपच यशस्वी झाला. तकदीर या सिनेमाच्या पाठोपाठच १९४४ साली आन-बान हा तिचा सिनेमा आला आणि त्यानंतर १९४५ साली हुमायून हा सिनेमा आला. हुमायून या सिनेमात तिच्याबरोबर अशोक कुमार याने काम केले होते.

१९४८ साली प्रथम तिने राज कपूर बॅनरखाली आलेल्या आग या सिनेमात काम केले आणि त्यानंतर राज कपूर नर्गिस या हिट जोडीने सुमारे डझनभर चित्रपटात एकत्र काम केले व एक इतिहास निर्माण केला. १९४८ याच वर्षी नर्गिस हिचा मेला हा एक हिट सिनेमा आला. या सिनेमात तिने दिलीप कुमार बरोबर काम केले होते. या सिनेमातील गाणी शमशाद बेगम, मुकेश, मोहम्मद रफी यांनी म्हटली होती.

मुकेश यांचे 'गाये जा गीत मिलन के तू अपने लगन के' हे गाणे खूप गाजले. या चित्रपटाने सुमारे ५० लाखाचा धंदा केला. म्हणजे आजच्या हिशोबात म्हटलं तर जवळजवळ ५०० कोटी रुपयांचा धंदा केला.

त्यानंतर १९४९ साली आला एक ब्लॉकबस्टर हिंदी सिनेमा, ज्याचं नाव होतं अंदाज. या सिनेमात नर्गीस बरोबर दिलीप कुमार आणि राज कपूर या सुप्रसिद्ध हिरोनी काम केलं होतं. या सिनेमात प्रेमाचा त्रिकोण होता. सिनेमाचं संगीत नौशाद यांनी दिलं होतं आणि त्यातील गाणी लता मंगेशकर, मुकेश, मोहम्मद रफी आणि शमशाद यांनी म्हटली होती. या सिनेमातील मुकेश यांनी गायलेली 'झूम झूमके नाचो आज' व 'हम आज कही दिल खो बैठे' ही दोन गाणी खूपच गाजली.

'डर ना मोहब्बत कर ले' हे लता मंगेशकर व शमशाद बेगम यांच्या आवाजातील गाणंही खूप गाजलं होतं. अंदाज या सिनेमामुळे राज कपूर च्या करिअरला जोरदार सुरुवात झाली. त्याचप्रमाणे दिलीप कुमार व नर्गिस यांनाही चित्रपटसृष्टीत कलाटणी मिळाली व पुढे ते यशस्वी ठरले. अंदाजच्या पाठोपाठ आणखी एक ब्लॉकबस्टर सिनेमा आला तो म्हणजे बरसात. बरसात या सिनेमाचं राज कपूर याने दिग्दर्शन केलं होतं आणि त्यामध्ये राज कपूर, नर्गिस यांनी काम केलं होतं. त्याशिवाय प्रेमनाथ यानेही या सिनेमात काम केलं होतं. बरसात ने उत्पन्नाची १९५० सालची सर्व रेकॉर्ड मोडली.

याच सिनेमात निम्मी या नटीने यशस्वी पदार्पण केले.

बरसात हा सुप्रसिद्ध संगीतकार शंकर जयकिशन यांचा पहिला सिनेमा होता. यातील गाणी लता मंगेशकरने गायली आणि या गाण्यांनी एक इतिहास रचला. अत्यंत सुमधुर आणि मनाला लुभावणारी अशी गाणी बरसात मध्ये होती.

या गाण्यांची गोडी आजही कमी झालेली नाही. शंकर जयकिशन यांनी मेघ मल्हार, भैरवी इत्यादी रागांचा भन्नाट वापर करून बरसातला संगीत दिले होते. शंकर जयकिशन हे संगीतकार ऑर्केस्ट्राचा वापर करायला लागले. आणि त्यानंतर त्यांची राज कपूर बरोबर जोडी जमली व हिंदी चित्रपट सृष्टीला एकापेक्षा एक सरस, सुमधुर आणि मनाला आल्हाद देणारी अशी गाणी लाभली.शंकर जयकिशन यांचे संगीत ऐकून आतापर्यंत हजारो लोक आजारातून बरे झाले असतील.

बरसात मधील काही गाणी –

(१) बरसात मे हमसे मिले तुम, ताक धी ना धीं (२) जिया बेकरार है, (३) हवा मे उडता जाये मेरा लाल दुपट्टा मलमल का, (४) मेरी आंखोमे बस गया कोई रे, (५) पतली कमर है तिरछी नजर है, (६) छोड गये बालम... अशी भन्नाट गाणी त्यानी रचली. शंकर जयकिशन यांचे वैशिष्ट्य असे होते की ते पुढील येणाऱ्या सिनेमातील म्युझिक पिसेस आधीच रचायचे व त्याचा वापर आधीच्या सिनेमात खुबीने करायचे.बरसात मधील काही म्युझिक पिसेस नंतर त्यानी मेरा नाम जोकर मधे वापरले आहेत.

बरसात या सिनेमाची गाणी म्हणजे अक्षरशः सुखाची व आनंदाची श्रोत्यांवर केलेली बरसातच आहे आणि १९५१ मध्ये आणखी एक ब्लॉकबस्टर हिंदी सिनेमा राज कपूरने आर के बॅनर खाली आणला. राजने नर्गिसचे गुण हेरले होते आणि त्यामुळे त्याने नर्गिसचीच निवड केली. या सिनेमाचे नाव होते आवारा. परत एकदा शंकर जयकिशन यांनी रचलेल्या गाण्यांनी सर्व जगात धूम मचवली !

आवारा हा सिनेमा अमेरिका, ग्रीस, रशिया वगैरे परदेशातही तुफान चालला. भारतात तर त्याने उत्पन्नाचे रेकॉर्ड मोडले. बरसातपेक्षाही जास्त उत्पन्न आवाराने मिळवले. आवारामध्ये नर्गीसचा एक स्विमिंग सूटमध्ये शॉट आहे. नर्गिसने त्यावेळी स्विमिंग सूटमध्ये शॉट देण्याचे धाडसच केले. कारण त्या काळात असा शॉट देणे म्हणजे धाडसच होते. सध्याच्या काळात त्याचे कोणाला काही वाटले नसते.

राज कपूर जेव्हा आपल्या सिनेमात हिरोइनला घेत असे तेव्हा तो त्या हिरोईनला कमी कपडे घालून एक तरी सीन करायला लावत असे. अर्थात त्याची काही तशी जबरदस्ती नसे. पुढे बेवफा, अनहोनी, अंबर, मीना बाजार, जोगन, जान पहचान, बाबुल, आधी रात, हलचल, दीदार, धून, आह, अंगारे असे एका पाठोपाठ एक असे तिचे चित्रपट येत राहिले. या चित्रपटांपैकी काही अशोक कुमार बरोबर, काही दिलीप कुमार बरोबर, तर काही राज कपूर बरोबर होते.

१९५५ साली राज कपूर व नर्गिस यांचा श्री ४२० हा सिनेमा आला. त्यातील गाणीही खूपच गाजली आणि या सिनेमाने सुद्धा उत्पन्नाची रेकॉर्ड मोडली. नंतर १९५६ मध्ये आला चोरी चोरी. त्यात सुद्धा तिने राज कपूर बरोबर काम केले होते. श्री ४२० व चोरी चोरी या सिनेमातील गाणी खूपच मधुर आणि मनाला लुभावणारी आहेत.

नंतर आला मदर इंडिया. मदर इंडिया मधील नर्गीसचा रोल अत्यंत गाजला. जाणकारांच्या मते मदर इंडिया मधील नर्गिस ने केलेले काम दुसरे कोणीही करू शकणार नाही. उत्पन्नाची सर्व रेकॉर्डस् मदर इंडियाने मोडली होती. मदर इंडिया मधील कामाबद्दल नर्गिसला उत्कृष्ट अभिनेत्रीचे अवॉर्ड मिळाले. १९५८ साली नर्गिसने सुनिल दत्त बरोबर लग्न केले आणि त्यानंतर तिने काही अपवाद वगळता जवळजवळ चित्रपटात काम करण्याचे सोडून दिले.

Karlovy vary international film festival मधे अवॉर्ड मिळवणारी नर्गिस ही पहिली भारतीय होती. नर्गिस काही काळासाठी राज्यसभेची सदस्य होती. नर्गिसला पांढरी साडी नेसायला आवडत असे. सारखे फोनवर बोलत रहाण्याचा तिला षौक होता. मुंबईच्या रस्त्यावरील पाणीपुरी तिला खूप आवडत असे. अशी ही गुणी व चतुरस्र अभिनेत्री कॅन्सरच्या विळख्यात सापडली. तिच्यावर बरेच उपचार करण्यात आले परंतु शेवटी तिला कॅन्सरने त्रस्त करून सोडले व तिची जीवन ज्योत मालवली !

– **प्रकाश गणेश गानू,** मोबा. ९४२११९२९८४७

## कोल्हापूर चित्पावन संघ व 'वुई फॉर अवर्स' तर्फे आयोजित

# चित्पावन खाद्य महोत्सव २०२४

तर चित्पावन रसिकहो... आपण आपल्या अंगातील कलागुण तर सगळ्यांना दाखवले... अगदी लहानांपासून मोठ्यांपर्यंत प्रत्येकाने काहीतरी वेगळेपण देण्याचा प्रयत्न केला. आता जरा आपल्या जिभेला एक वेगळी तृप्ती देऊयात काय? तर आता सर्वांनी आपल्या अंगात लपलेला एक शेफ बाहेर काढूया... आपल्यातील अनेकांना किचनमध्ये लुडबुड करायची सवय असतेच... पण ती घरच्यापुरतीच. जर आपण एखादा पदार्थ उत्तम बनवत असू आणि तो एखाद्याला खायला दिल्यावर त्याच्याकडून येणारी तारीफ ऐकल्यावर होणारे समाधान काही निराळंच.

तर मग चला, यंदा आपण एक अनोखा प्रयत्न करू. चित्पावन खाद्य महोत्सवात आपल्यातील त्या लपलेल्या शेफला वाट देऊ आणि आपल्या चमचमीत खाद्य पदार्थांनी आपल्याच आप्त स्वकीयांना तृप्त करूया.

**चित्पावन खाद्य महोत्सव २०२४ :-** (१) यामध्ये प्रत्येकी एक स्टॉल देण्यात येईल. (२) प्रथम येणाऱ्यास प्रथम संधी दिली जाईल. (३) स्टॉल साठी बुकिंग आवश्यक असेल. रुपये २००/- एका स्टॉल साठी सहभाग शुल्क असेल. (४) फक्त चित्पावन कोकणस्थ सदस्यांना स्टॉल देण्यात येईल. (५) एका प्रकारच्या खाद्य पदार्थाचा एकच स्टॉल देण्यात येईल. (६) सर्व खाद्य पदार्थ सहभागी स्टॉल धारकांनी स्वतः बनवून आणायचे आहेत. (७) बाहेरून कोणतीही तयार पदार्थ आणू नये. (८) खाद्य पदार्थांची किंमत रु. ५० पेक्षा जास्त असू नये. जेणेकरून सर्वांना त्याचा मनसोक्त उपभोग घेता येईल. (९) पदार्थ गरम करण्याचे साहित्य,देण्यासाठी डिश - चमचे स्वतः आणायच्या आहेत. (१०) मर्यादित स्टॉल असल्याने लवकरात लवकर बुकिंग करावे ही विनंती. बुकिंगची शेवटची तारीख १५ ऑगस्ट २०२४ आहे.

**✻ अधिक माहितीसाठी व बुकिंगसाठी संपर्क ✻**

**श्री. अमेय गोखले : ८४०८०६५२००     श्री . महेश पटवर्धन : ९८२२७८७९३१**

**विशेष सूचना :-** याच दिवशी या कार्यक्रमाआधी चित्पावन संघाच्या शैक्षणिक गुणगौरव उपक्रमा अंतर्गत बक्षीस वितरण समारंभ मंगलधाम येथे होणार आहे. यानंतर खाद्य महोत्सव होणार आहे. आणि या कार्यक्रमांत सहभागी सभासद ,विद्यार्थी,सत्कारमूर्ती यांना प्रत्येक व्यक्तीस एक खाऊचे कूपन मोफत भेट देण्यात येईल.

**स्थळ : मंगलधाम हॉल, बिनखांबी गणेश मंदिर जवळ, कोल्हापूर**

**दिनांक : शनिवार, दि. २४ ऑगस्ट २०२४   वेळ : संध्याकाळी ६.०० ते रात्री ९.००**

# फ्रान्समध्ये सापडली 'शिवरायांची बखर'

### गुरुप्रसाद कानिटकर आणि मनोज दाणी यांचे महत्वपूर्ण संशोधन

नॅशनल लायब्ररी ऑफ फ्रान्समध्ये इतिहास संशोधनासाठी लागणारी जुनी कागदपत्रे चाळत असताना पुणे येथील इतिहास संशोधक आणि लेखक गुरुप्रसाद कानिटकर आणि मनोज दाणी यांना छत्रपती शिवाजी महाराज यांची जुनी अप्रकाशित बखर सापडली आहे. मोडी लिपीतील हस्तलिखित स्वरूपात असलेली ही सन १७४० नंतर लिहिलेली बखर आत्तापर्यंत मिळालेल्या सर्व ९१ कलमी बखरींचा पूर्वसूरी दस्तावेज मानला जातो. इतिहास संशोधक गुरुप्रसाद हे मूळचे कोल्हापुरातील शुक्रवार पेठेतील असून त्यांचा जन्म, शिक्षण येथेच झाले आहे. चित्पावन संघाचे माजी कार्यवाह कै. द. गो. कानिटकर यांचे गुरुप्रसाद हे सुपुत्र. सध्या ते नोकरीनिमित्त अमेरिकेत आहेत. त्यांना इतिहास संशोधन आणि लेखनाची आवड असून सहा महिन्यांपूर्वी फ्रान्समधील बी.एन.एफ. येथील हस्तालिखित विभागात जुनी कागदपत्रे पाहताना त्यांना छत्रपती शिवरायांची ही जुनी अप्रकाशित बखर सापडली. ही बखर चिमाजी आप्पांच्या सिद्दीवरील स्वारीनंतर म्हणजे अंदाजे १७४० नंतर लिहिली गेली असावी. बखरीच्या शेवटी 'ही किताबत राजश्री राघो मुकुंद याची असे' असा उल्लेख आहे.

छत्रपती शिवाजी महाराजांची पूर्ण कारकीर्द आणि संभाजी महाराजांच्या कारकीर्दीचा प्रारंभ यासह महाराज व सईबाई यांच्यातील संवाद, बोरीची काठी महाराजांच्या पालखीला कशी अडकाठी करत होती? आणि तेथे खणल्यावर कसा द्रव्यलाभ झाला? अफझलखानाला मारले त्यावेळी कोण लोक हजर होते? विविध साधू-संतांच्या महाराजांनी घेतलेल्या भेटी असे अनेक बारीक तपशील या बखरीमध्ये आहेत. छत्रपती संभाजी महाराज रायगडी आले त्यावेळी तिथे असलेले सामान त्यांनी आपल्या ताब्यात घेतले. त्याची यादीही बखरकाराने बहुधा एखाद्या जुन्या अस्सल जमाखर्चाच्या आधाराने दिली असल्याचे कानिटकर यांनी सांगितले. या सर्व माहितीचे लवकरच पुस्तक प्रकाशित करण्यात येईल. त्यातून शिवरायांचे जीवनचरित्र व त्यावेळच्या लोकजीवनाची माहिती सर्वांसमोर येणार आहे असे ते म्हणाले.

# कोल्हापूर चित्पावन संघ, कोल्हापूर
# शैक्षणिक पारितोषिक योजना २०२४-२०२५
**(फक्त सभासदांचे मुलामुलींसाठीच)**
## शैक्षणिक अर्हता व बक्षिसे

१. **प्राथमिक शाळा स्तर –** १ ली ते ४ थी वार्षिक परीक्षेत सर्वोत्तम गुण मिळविणाऱ्यांना बक्षिसे.
२. **माध्यमिक –** ५ वी ते ९ वी वार्षिक परीक्षेत सर्वोत्तम गुण मिळविणाऱ्यांना बक्षिसे.
३. **स्कॉलरशिप परीक्षा –** ४ थी व ७ वी परीक्षेत यश मिळविणाऱ्यांना बक्षिसे.
४. **हायस्कूल स्तर/एस.एस.सी. –** इयत्ता १० वी स्तरावर प्रथम येणारी मुलगी, प्रथम येणारा मुलगा, तसेच इंग्रजी, गणित, संस्कृत व मराठी या विषयात सर्वोत्तम गुण प्राप्तीसाठी बक्षिसे.
५. गणित प्रज्ञा परीक्षा, MTS, NTS परीक्षा इ.क्षेत्रात विशेष प्रावीण्य मिळविणाऱ्या पाल्यांना बक्षिसे.
६. **कनिष्ठ महाविद्यालय/एच.एस.सी. –** इ. १२ वी (तीनही शाखा) मुलांत प्रथम, मुलीत प्रथम, तसेच इंग्रजी, गणित आणि संस्कृत विषयात सर्वोत्तम गुण प्राप्तीसाठी बक्षिसे.
७. **पदवी स्तर –** कला, शास्त्र आणि वाणिज्य या तीन विद्याशाखांत तसेच बी.बी.ए., बी.सी.ए. गुणानुक्रमे प्रथम येणाऱ्यांना बक्षिसे.
८. **पदव्युत्तर स्तर –** कला, शास्त्र, वाणिज्य, अभियांत्रिकी आणि वैद्यकीय शाखांत तसेच एम.सी.ए. मध्ये प्रथम येणाऱ्या पाल्यांसाठी बक्षिसे.
९. **विशेष बक्षीस योजना –** एमबीबीएस, एम.टेक., सीए, आयसीडब्ल्यूए. तसेच ललित कला, संगीत कला, वक्तृत्व कला, क्रीडा, चित्रकला इत्यादी क्षेत्रात विशेष प्रावीण्य मिळविणाऱ्या पाल्यांना बक्षिसे.
१०. **पत्रकारिता शिक्षणासाठी उत्तेजनार्थ बक्षीस**
मागील वर्षापासून बक्षिसामध्ये खालीलप्रमाणे वाढ करण्यात आलेली आहे याची कृपया नोंद घ्यावी.
११. **इ. १ ली ते ९ वी –** प्रत्येकी तीन क्रमांक. **१२. इ. ४ थी व इ. ७ वी –** स्कॉलरशिप – प्रत्येकी तीन क्रमांक.
१३. **इ. १० वी –** १. विद्यार्थ्यांत प्रथम व विद्यार्थिनीत प्रथम, २. विषयवार बक्षिसे (प्रथम व द्वितीय)
अ. इंग्रजी, ब. गणित, क.संस्कृत, ड.मराठी, इ. विज्ञान
१४. **इ. १२ वी –** १. विद्यार्थ्यांत प्रथम व विद्यार्थिनीत प्रथम (शाखानिहाय),
२. विषयवार (शाखानिहाय – प्रथम व द्वितीय) –
अ. इंग्रजी, ब.गणित, क.संस्कृत, ड. विज्ञान,
१५. **शाखानिहाय पदवीधर –** आर्टस्, कॉमर्स, सायन्स, इंजिनिअरींग, मेडिकल, एल्.एल्.बी.
१६. **पदव्युतर –** एम्.ई. एम्.टेक्., सर्जरी, एल्.एल्.एम्., एम्.ए. एम्.कॉम, एम्.एस्सी., एम.बी.ए., सी.ए., UPSC, MPSC
१७. **प्रवेश परीक्षा –** सी.ए.(CPT) एन.डी.ए.(Foundation) आय.आय.टी. (JEE) आय.सी. डब्ल्यू, व सी.एस्.(Foundation) **१८.** गरजू, होतकरू विद्यार्थी/विद्यार्थिनी–इ.१० व १२वी
१९. **इतर –** वक्तृत्व,संगीत, पाककृती, कलाकार २०. **पत्रकारिता –** १. शिक्षण २. विशेष योगदान

**संस्थेकडील विहित नमुन्यातील अर्ज पूर्ण भरून आवश्यक ते कागदपत्रे जोडून कोल्हापूर चित्पावन संघ कार्यालयात ता. 31 जुलै 2024 पर्यंत जमा करावेत. संघाची कार्यकारिणी तसेच शैक्षणिक समिती पारितोषिकांबाबत योग्य निर्णय घेईल. अर्जदार (पालक) संघाचे सभासद असणे आवश्यक आहे. मुदतीनंतर आलेले अर्ज स्वीकारले जाणार नाहीत.**

### कोल्हापूर चित्पावन संघ आणि 'वुई फॉर अवर्स' आयोजित

# पैसा झाला मोठा, नाही आनंदाला तोटा !

मित्रांनो नमस्कार,

अमुक अमुक एका माणसाला शेअर बाजारातून कोट्यवधीचा नफा झाला, किंवा सेंसेक्सने उसळी घेतली, निफ्टी अमुक अंशांनी वधारली, मार्केटमध्ये तेजी आली किंवा मार्केट कोसळले. अशा प्रकारच्या गप्पा आपण आपल्या आजूबाजूला, टीव्ही चॅनेल्स वर किंवा न्यूज पेपर, सोशल मीडिया वर नेहमी ऐकत असतो. तुम्हालाही कधी कधी कुतूहल निर्माण झाले असेलच, नेमक्या या गोष्टी आहेत काय? कशाशी संबंधित आहेत? शेअर आणि शेअर बाजार म्हणजे नेमक काय? ते चालवतं कोण? शेअर बाजारात खरच इतका पैसा कमावता येतो का? असे अनेक प्रश्न आपल्याला पडत असतात. तुमच्या या आणि शेअर बाजाराशी संबंधित अशा अनेक प्रश्नांची उत्तरं तुम्हाला मिळणार आहेत. याच करीता आपण हे चर्चासत्र तुमच्यासाठीच आयोजित केले आहे.

शेअर बाजारात गुंतवणूक करण्यासाठी कोणत्याही शिक्षणाची अट नाही. शेअर बाजार हा सर्वांसाठी खुला आहे. अनेक लोकांमध्ये हा गैरसमज आहे की, शेअर बाजार हा फक्त पैसेवाल्यांसाठी आहे किंवा शेअर बाजार हा जुगार आहे, त्यामुळे अनेक जण शेअर बाजारांपासून लांबच राहणं पसंद करतात. त्यात गुंतवणूक करण्यासाठी घाबरतात. कारण त्यांना त्यांचे पैसे बुडण्याची भीती वाटते. पण जर तुम्ही योग्य पद्धतीने अभ्यास केलात, नीट माहिती घेतलीत तर तुम्हाला त्यात नक्कीच खूप फायदा मिळेल.

श्री. प्रसाद प्रभाकर भिडे आपल्याला शेअर बाजार आणि त्यांच्याशी संबंधित इतर अनेक महत्वपूर्ण गोष्टी सोप्या भाषेत समजून सांगणार आहेत. श्री भिडे १९८९ पासून शेअर बाजारात एक इन्व्हेस्टर, ट्रेडर आणि उत्तम ॲडव्हायझर म्हणून कार्यरत आहेत. चला तर मग ३० जून २०२४ रविवार रोजी सकाळी १०.०० ते १२.०० यावेळेत चित्पावन संघ हॉल, गुरुमहराज वाड्याजवळ, कोल्हापूर येथे चर्चासत्र आयोजित केले आहे. यामध्ये आपल्याला खालील गोष्टींची सविस्तर माहिती तीही सर्व वयोगटासाठी विनामूल्य मिळणार आहे.

- शेअर बाजाराची तोंडओळख
- चांगला परतावा मिळणाऱ्या गुंतवणुकीचे भारतातील अनेक मार्ग.
- शेअर बाजारात केलेली गुंतवणूक ही अधिक फायद्याची कशी?
- शेअर बाजारात कशाप्रकारे गुंतवणूक करावी?
- अगदी महिन्याला ५००/- रू. सेविंग करणारी व्यक्ती ही शेअर बाजारात कशी गुंतवणूक करू शकते?
- रिटायर व्यक्तींना एक हमखास उत्तम रिटर्न्स मिळण्याचा राजमार्ग.
- तुम्ही तुमच्या मुलांच्या, नातवंडांच्या उज्वल भविष्या करिता शेअर बाजारात गुंतवणूक करू शकता.
- प्रिय व्यक्तीच्या वाढदिवसालाही आपण शेअर्स च्या स्वरूपात भेट देऊ शकतो. ती कशी?
- आजच्या तरुण पिढीने शेअर बाजारात गुंतवणूक करायलाच हवी .ती कशी करायची?
- तर नक्की याचा लाभ घ्यायला भेटूच. मर्यादित प्रवेश असल्याने नियोजनासाठी कृपया २८ जून २०२४ पर्यंत कॉल करून नोंदणी करावी.

आयोजक,

**Team We For Ours**

कोल्हापूर चित्पावन संघ, कोल्हापूर

**अधिक माहिती व नोंदणी साठी संपर्क**

**अमेय श्रीकृष्ण गोखले : मोबा.** 8408065200


**केदार जोशी : मोबा.** 7588839527

• Regd. No. MAHMAR/2015/66822 Navsneha Monthly •
Posting Under Concessional Rate Regd. No. KLR-335/2022-2024


# SHOGINI TECHNOARTS PVT. LTD.

ISO 9001-2008
UL Approved

Manufacturers of Printed Circuit Boards
Metal Clad PCBs for LED applications.




- Manufacturing Excellence in Fabrication of Single Layer, Two Layer & Multilayer PCBs.
- Multilayer PCBs - Prototype & volumes.
- High density SMT, Fine Line Boards - 6 mil Tracks/0.25 mm Via holes.
- RoHS Compliance
- Top Class Testing facilities including Universal BBT with SMD Testing.
- Large Manufacturing Capacity 1,60,000 Sq. mtrs. per annum.
- Well equipped plant with ultra modern Machines
- Fastest Delivery at competitive price.
- Satisfied Customers all over India & Abroad.
- CAD-CAM, Prototype, Large Scale Production under one roof.

**Quality Approvals**
ISO 9001-2000 Certified & UL Approved
Also approved by C-DOT, BSNL, RDSO




**HEAD OFFICE :**
"SHOGINI" S. No. 5 (P) Katraj-Dehuroad By Pass, Near Sinhagad Road Flyover, Ambegaon Budruk, Pune 411046 (INDIA)
Tel.: +91 20 6647 1700 Fax. : +91 20 6647 1714

**FACTORY :**
Gat No. 788, Khed - Shivapur, Taluka Haveli, Dist. Pune 412 205. (INDIA) Tel. : +91 20 6647 1800
Fax. : +91 20 6647 1820

**E-mail :**
info@shogini.com

**Visit us at :**
www.shogini.com


प्रति,
सौ./श्री.

कोल्हापूर चित्पावन संघाचे हे मुखपत्र संपादक-मुद्रक-प्रकाशक श्री. सदानंद दिनकर मराठे यांनी
मुद्रिका कमर्शियल प्रिंटर्स, १३०५, ए वॉर्ड, शिवाजी पेठ, कोल्हापूर येथे छापून कोल्हापूर चित्पावन संघ, तुळजाभवानी संकुल,
गुरुमहाराज वाड्याजवळ, मंगळवार पेठ, कोल्हापूर येथून प्रकाशित केले आहे.